RNI No. - MAHMAR 2023/84526

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com

❑ वर्ष - १ ❑ अंक -२७८ ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ बुधवार दि.१० जानेवारी २०२४ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६


# खरी शिवसेना शिंदे गटाचीच : नार्वेकर

## उद्धव ठाकरेंना मोठा धक्का : गोगावलेंना प्रतोद म्हणून मान्यता

**दि.१०विदर्भ प्रजासत्ताक मुंबई**

गेल्या ८ ते १० महिन्यांपासून राज्यात चर्चेत असणाऱ्या शिवसेना आमदार अपात्रता प्रकरणावरील निकालाची अवघ्या राज्याला प्रतीक्षा होती. या निकालावरून शिंदे गट व ठाकरे गट या शिवसेनेच्या दोन्ही गटांमध्ये गेल्या ८ महिन्यांत राजकीय सुंदोपसुंदी पराकोटीला पोहोचली. राज्यातील सरकारचं भवितव्य ठरवणारा हा निकाल विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर देणार असल्यामुळे त्याकडे राजकीय वर्तुळासोबतच राज्यातील समस्त जनतेचं लक्ष लागून राहिलेले होते .

शिवसेना आमदारांच्या अपात्रतेच्या निकालाचं वाचन करताना विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकरांनी मोठं वक्तव्य केलं आहे. शिवसेनेची १९९९ सालची घटना वैध असून २०१८ साली ठाकरेंनी केलेली घटनादुरूस्ती मान्य नसल्याचं राहुल नार्वेकर म्हणाले. १९९९ सालची घटना शिवसेनेची निवडणूक आयोगाकडे दाखल झालेली अभिलेखावर असलेली एकमेव घटना असल्याचं ते म्हणाले. त्यामुळे उद्धव ठाकरेंना हा पहिला धक्का बसल्याचं मानलं जात आहे.

प्रथमदर्शनी निवडणूक आयोगाकडे असलेल्या १९९९ सालच्या शिवसेनेच्या घटनेचा आधार घ्यावा लागेल असं सांगत २०१८ सालची शिवसेनेची घटना स्वीकारता करता येणार नाही असं विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर म्हणाले.'२०१८ सालची घटना ग्राह्य धरण्याची मागणी ठाकरे गटाकडून करण्यात आली होती. पण, २०१८ सालच्या घटनेची नोंद निवडणूक आयोगाकडे नाही. निवडणूक आयोगाकडे असलेली प्रत ही शिवसेनेची १९९९ सालची घटना असून तीच ग्राह्य धरली जाईल. २०१८ सालची घटना ग्राह्य धरा ही ठाकरे गटाची मागणी अमान्य करण्यात आली आहे.'', असं विधानसभा अध्यक्षांनी निकालवाचनात स्पष्ट केलं आहे.

### महानिकालाचे वाचन सुरु



महाराष्ट्राच्या राजकारणात जुलै २०२२ मध्ये मोठा भूकंप घडून आला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शिवसेना पक्षात मोठं बंड पुकारलं आणि ते काही आमदारांना घेऊन सुरत, आणि नंतर गुवाहाटीला निघून गेले. त्यानंतर काही दिवसांनी एकनाथ शिंदे यांनी शिवसेनेच्या ४० आणि १० अपक्ष अशा जवळपास ५० आमदारांच्या मदतीने भाजपसोबत सत्ता स्थापन केली. एकनाथ शिंदे नव्या सरकारचे मुख्यमंत्री बनले. या घडामोडींनंतर हे प्रकरण निवडणूक आयोगाकडे गेलं. तसेच सुप्रीम कोर्टातही याप्रकरणी सुनावणी झाली. निवडणूक आयोगाने शिवसेना पक्षाचं नाव आणि चिन्ह मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना बहाल केलं. तर सुप्रीम कोर्टाने आमदार अपात्रतेचा निकाल घेण्याचा अधिकार विधानसभा अध्यक्षांना बहाल केला.मी दोन्ही गटाच्या वकिलांनी सुनावणीवेळी सहकार्य केल्याबद्दल आभार मानतो. सुप्रीम कोर्टाचे आभार मानतो, असं राहुल नार्वेकर सुरुवातीला म्हणाले. याचिका क्रमांक १८ ही तिसऱ्या गटात आहे. चौथ्या गटात याचिका क्रमांक १९चा समावेश आहे. व्हीपचे उल्लंघन केल्याचा त्यात आरोप आहे. पाचव्या गटात बहुमत प्रस्तावात विरोधी मतदान केल्याचे आरोप आहेत. सर्वोच्च न्यायालयाचा आदर ठेवून मी निकाल देत आहे. प्रत्येक गटातील ठळक मुद्दे मी वाचून दाखवणार आहे. पहिल्या गटातील निरिक्षण मी वाचून दाखवतो, असं अध्यक्ष सुरुवातीला म्हणाले.

**योगेश कदम यांची साक्ष महत्त्वाची**

शिवसेनेच्या घटनेसंदर्भात योगेश कदम यांची साक्ष महत्त्वाची ठरली असं विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर म्हणाले. दोन्ही गटांकडून घटना मागितली गेली, पण दोन्ही गटांकडून घटना प्राप्त झाली नाही. त्यामुळे निवडणूक आयोगाने दिलेली शिवसेनेच्या घटनेची प्रत ग्राह्य धरली जाईल. शिवसेनेच्या घटनेत २०१८ साली करण्यात आलेली दुरुस्ती ग्राह्य धरता येणार नाही.नेतृत्वाची रचना तपासण्यापुरतंच पक्षाच्या घटनेचा आधार घेतल्याचं राहुल नार्वेकर म्हणाले. त्याचा आधार घेऊन अपात्रतेचा निर्णय घेण्याआधी शिवसेना कुणाची याचा निर्णय घेणार असल्याचंही ते म्हणाले.

# विदर्भात हजारो ट्रक पुन्हा थांबले! 'हिट ॲण्ड रन'विरोधात संप

**दि.१० विदर्भ प्रजासत्ताक नागपूर:**

'हिट ण्ड रन' कायद्याची तूर्तास अंमलबजावणी होणार नाही, असे केंद्र सरकारने स्पष्ट केल्यानंतरही या कायद्याच्या विरोधात ९ जानेवारीच्या मध्यरात्रीपासून ट्रकचालकांनी आंदोलन सुरू केले. परिणामी, विदर्भातील १५ हजारांवर ट्रकची चाके थांबली. या आंदोलनामुळे जीवनावश्यक वस्तूंसह इतर मालवाहतुकीचा प्रश्न गंभीर होण्याची शक्यता आहे.



देशाच्या मध्यभागी असल्याने नागपुरातून देशाच्या चारही दिशेला रोज हजारो ट्रक विविध वस्तूंची वाहतूक करतात. दरम्यान, नागपुरातील अनेक ट्रांसपोर्ट कंपनीतील चालकांनी कायद्याला विरोध करत सेवेवर येण्यास नकार दिला. त्यामुळे शनिवारी रात्री व रविवारी मालवाहतुकीच्या बऱ्याच फेऱ्या रद्द कराव्या लागल्या. या आंदोलनात तूर्तास स्कूलबस आणि रुग्णवाहिकांचे चालक सहभागी झालेले नाहीत. त्यामुळे सध्या नागपूरसह विदर्भात स्कूलबस आणि रुग्णवाहिकेच्या वाहतुकीवर परिणाम होणार नाही. पेट्रोल-डिझेलसह इंधन टँकरची वाहतूक करणाऱ्या चालकांनीही मंगळवारी रात्रीपर्यंत सेवा सुरू ठेवली. परंतु बुधवारी ट्रकचालकांचा संप बघून तेही आंदोलनात उतरल्यास इंधनाचा पुरवठा पुन्हा विस्कळीत होण्याचा धोका आहे. प्रवासी वाहतूक करणाऱ्या खासगी ट्रॅव्हल्सची सेवा तूर्तास सुरू असल्याचे बाबा ट्रॅव्हल्सचे संचालक बाबा डवरे यांनी सांगितले.

> केंद्र सरकारच्या हिट ॲण्ड रन कायद्याला विरोध करत ट्रकचालकांनी सेवेवर येण्यास नकार दिला आहे. त्यामुळे मालवाहतूक बंद होण्याच्या मार्गावर आहे. केंद्र सरकारने तातडीने हस्तक्षेप करत हा कायदा रद्द करावा व केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनीच त्याबाबत स्पष्टीकरण द्यावे. असे घडले तर ट्रकचालकांमध्ये विश्वास वाढून आंदोलनासारखे प्रकार टळतील.
>
> **कुक्कू मारवाह, अध्यक्ष,**
> **नागपूर ट्रक्स युनिटी असोसिएशन.**

# राम मंदिरात पहिला दरवाजा सोन्याचा बसवला

## सोन्याचा दरवाजा तयार करण्यासाठी हैदराबाद येथील कंपनीला टेंडर

**दि.१० विदर्भ प्रजासत्ताक अयोध्या**

अयोध्येतील राम मंदिराची काम आता अंतिम टप्प्यावर आले आहे. २२ जानेवारी रोजी प्राणप्रतिष्ठा सोहळा होणार आहे. या सोहळ्याची जोरदार तयारी सुरू आहे. काल राम मंदिरातील पहिल्या सोन्याच्या दरवाजाचा फोटो समोर आला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते मंदिराचे उद्घाटन होणार असून यादरम्यान मंदिरात अभिषेकही करण्यात येणार आहे.



उद्घाटनापूर्वी मंदिराशी संबंधित नवनवीन माहिती आणि फोटो सातत्याने समोर येत आहेत. राम मंदिरात लावल्या जाणार्या सुवर्ण दरवाजाचा पहिला फोटो समोर आला आहे, यावर अतिशय सुंदर नक्षीकाम करण्यात आले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, हा दरवाजा १२ फूट उंच आणि ८ फूट रुंद आहे. हा दरवाजा नुकताच पहिल्या मजल्यावर बसवण्यात आला आहे.

राम मंदिरात एकूण ४६ दरवाजे बसवण्यात येणार आहेत. यातील ४२ दरवाजे एकूण १०० किलो सोन्याने मढवले जाणार आहेत. मंदिराच्या पायऱ्यांजवळील चार दरवाजे सोन्याने मढवले जाणार नाहीत. येत्या काही दिवसांत आणखी १३ सोन्याचे दरवाजे बसवले जातील. राम मंदिराच्या गोल्डन गेटच्या शेअर केलेल्या फोटोंमध्ये मध्यभागी दोन हत्तींचे चित्र कोरण्यात आले आहेत.

दरवाजाच्या वरच्या भागात राजवाड्यासारखा आकार तयार करण्यात आला आहे. दरवाजाच्या तळाशी चौकोनी आकारात सुंदर कलाकृती आहे. हे दरवाजे तयार करण्यासाठी हैदराबादच्या एका कंपनीला निविदा देण्यात आली होती. कंपनीने महाराष्ट्रातील गडचिरोलीच्या जंगलातून लाकूड निवडले होते.दरवाजा तयार करण्यासाठी कन्याकुमारीहून कारागिरांना बोलावण्यात आले. दरवाज्यांचे फोटो येण्यापूर्वी राम मंदिराचे रात्रीचे फोटो समोर आले होते. या फोटोमध्ये राम मंदिर परिसर अतिशय भव्य दिसत आहे.

# राम मंदिर कार्यक्रमानिमित्त शिंदे सरकार महाराष्ट्रातील जनतेला देणार आनंदाचा शिधा

**दि.१०विदर्भ प्रजासत्ताक मुंबई**

२२ जानेवारी रोजी भगवान रामाच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा अयोध्येतील राम मंदिरात करण्यात येणार आहे. हा दिवस अवघ्या भारतीयांसाठी महत्त्वाचा दिवस असणार आहे. तसंच, २२ जानेवारी रोजी देशभर दिवाळी साजरी करण्याच्याही सूचना देण्यात आल्या आहेत. त्यानिमित्ताने महाराष्ट्रातील जनतेला राज्य सरकारने आनंदाचा शिधा देण्याचं ठरवलं आहे.



२२ जानेवारी दिवाळी साजरे करण्याचे आवाहन करण्यात आल्यानंतर विरोधकांनी आनंदाचा शिधा वाटण्याचे उपहासात्मक आवाहन केले होते. तसंच, राम मंदिराच्या कार्यक्रमासाठी देशभर आतिषबाजी करण्यात येणार असून शासकीय इमारतींना रोषणाई करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. याचा अर्थ देशभर सर्वत्र दिवाळीचा महौल असणार आहे.

राज्यातील अनेकांनाही राम मंदिर कार्यक्रमाचे आमंत्रण आले आहे. तर, राज्यातील अनेक रामभक्त अयोध्येच्या दिशेने जाणार आहेत. दरम्यान, राज्यातील सामान्य नागरिकांनाही या दिनाचा सोहळा करता यावा याकरता राज्य सरकारने आनंदाचा शिधा देण्याचा निर्णय घेतला आहे. भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी यासंदर्भात एक्सद्वारे माहिती दिली आहे.

चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, राज्य सरकारची जनतेला आनंददायी भेट. महाराष्ट्रातील महायुती सरकारने आज सर्वसामान्य नागरिकांना आनंदाची भेट जाहीर केली. प्रभू श्रीरामाच्या २२ जानेवारीच्या प्राणप्रतिष्ठा सोहळ्यानिमित्त आनंदाचा शिधा देण्याचा निर्णय घेतला. तसेच १९ फेब्रुवारी रोजी छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त राज्यातील सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत पात्र शिधापत्रिकाधारकांनाही आनंदाचा शिधा दिला जाणार आहे. राज्याच्या मंत्रिमंडळानचे हे निर्णय म्हणजे हे सरकार सर्वसामान्य जनतेचे व लोककल्याणकारी आहे, याचीच साक्ष देणारे आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे मी मनःपूर्वक आभार मानतो.

# उपमुख्यमंत्री अजित पवार 'विजयगड'वरूनही कारभार पाहणार

**दि.१०विदर्भ प्रजासत्ताक नागपूर**

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासाठी नागपुरात विजयगड हा शासकीय बंगला नव्यानेच तयार करण्यात आला आहे. अधिवेशन काळात उपुख्यमंत्र्यांना राहण्यासाठी का बंगला तयार करण्यात आला असला तरी तो आता उपमुख्यमंत्री तथा राज्याचे वित्त व नियोजनमंत्री अजित पवार यांचे नागपूर विभागीय कार्यालय म्हणून कार्यरत राहील. सचिन यादव हे उपजिल्हाधिकारी संवर्गातील अधिकारी, उपमुख्यमंत्र्यांचे विशेष कार्य अधिकारी तथा नागपूर कार्यालयाचे प्रमुख म्हणून जबाबदारी सांभाळणार आहेत. नागपूर, अमरावती विभागातील नागरिकांची, सामाजिक संस्था, संघटनांची कामे स्थानिक स्तरावरंच मार्गी लागावीत, मुंबईपर्यंत येण्याचे त्यांचे कष्ट थांबावेत या उद्देशाने अजित पवार यांनी नागपूर येथे उपमुख्यमंत्र्यांचे विभागीय कार्यालय सुरु केले आहे. नागपूरमधील नागरिकांच्या अडीअडचणी, समस्या, प्रश्न सोडवण्याबरोबरंच, मंत्रालयाशी संबंधीत त्यांची कामे तसेच कामांचा पाठपुरावा उपमुख्यमंत्र्यांच्या नागपूर विभागीय कार्यालयामार्फत केला जाणार आहे.

# पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना दशक्रियेचे आमंत्रण, संत्री उत्पादक शेतकऱ्याने केली होती आत्महत्या

**दि.१० विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

नैसर्गिक आपत्तीने झालेले नुकसान आणि त्यातच शेतमालाला योग्य भाव मिळत नसल्याने शेतकऱ्यांमध्ये निराशेचे वातावरण असून गेल्या वर्षभरात राज्यात सर्वाधिक शेतकरी आत्महत्या अमरावती विभागात झाल्या आहेत. नैसर्गिक कारणांमुळे घटलेली उत्पादकता, बांगलादेशकडून आयात शुल्कात वाढीच्या परिणामी घसरलेले दर यामुळे हतबल झालेल्या जरूड येथील शेतकऱ्याने घराबाहेर पडत मजुरीचा निर्णय घेतला. परंतु तेथेही निराशाच हाती आल्याने हतबलतेतून चंद्रपूर जिल्ह्यातील एका विहिरीत उडी घेत आपले जीवन संपविले. या शेतकऱ्याच्या दशक्रिया कार्यक्रमासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रातील सर्व मंत्री आणि लोकसभा, राज्यसभा सदस्यांना आमंत्रित करण्यात आले आहे. ही आमंत्रण पत्रिका सध्या समाजमाध्यमांवर प्रसारीत झाली आहे.



वरूड तालुका संत्री उत्पादक शेतकऱ्यांनी ही आमंत्रण पत्रिका तयार केली आहे. काही दिवसांपूर्वी जरूड येथील पद्माकर बापुराव दारोकर (वय ४८) यांनी आत्महत्या केली होती. जेमतेम दीड एकर शेतीवर त्यांच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह चालत होता. त्यांच्या शेतात संत्र्याची बाग आहे. पण, यंदा सुरुवातीला त्यांना फळगळतीचा सामना करावा लागला. त्यानंतरच्या काळात वाचलेल्या फळांना चांगला दर मिळेल, अशी अपेक्षा असताना बांगलादेशने आयात शुल्कात वाढ केल्याने त्याचा फटका संत्री उत्पादकांना बसला. संत्र्याचे भाव कोसळले, त्यामुळे पद्माकर दारोकर यांच्या अडचणीत आणखी भर पडली. त्यामुळे त्यांनी बागेतील फळांचा व्यवहार केला नव्हता. काहीतरी काम करून पैशांची गरज भागविण्याचे आणि नंतर दरात तेजी आल्यावर बागेचा व्यवहार करण्याचे ठरवून ते चंद्रपूर जिल्ह्यात रोजंदारीच्या कामासाठी पोहोचले, पण तेथेही काम न मिळाल्याने त्यांनी चंद्रपूर जिल्ह्यातील पिंपळगाव येथील एका शेतातील विहिरीत उडी घेऊन आत्महत्या केली होती.संत्री विकली जात नसल्याने जरूड येथील शेतकरी पद्माकर दारोकर यांनी आत्महत्या केली असून गावकरी शेतकऱ्यांनी १२ जानेवारी रोजी दशक्रियेचा कार्यक्रम करण्याचे ठरविले आहे.

## संपादकीय ......

# पदभार स्वीकारण्याआधीच पराभूत झालेला मंत्री !

राजस्थान काँग्रेस कार्यकर्त्यांच्या मुखी एक डायलॉग आहे. तो म्हणजे 'हार के जितनेवाले को बाजीगर केहते है. काँग्रेसने राजस्थान गमावलं, मात्र पोटनिवडणूकीत मोठा विजय मिळवला. हा विजय मोठा असण्याचं आणखीन एक कारण म्हणजे एका मंत्र्यांचा पराभव त्यांनी केल आहे. त्या मंत्र्यावर भाजपचा प्रचंड विश्वास होता. तो इतका की, विधानसभा निवडणूकीतून सभागृहात पोहचायच्या आधी त्यांना मंत्रीपद दिलं होतं. अशा उमेदवाराचा काँग्रेसनं पराभव केला. राजस्थानमध्ये आमदार म्हणून निवडून येण्यापूर्वी सुरेंद्र पाल सिंह टीटी मंत्री बनले होते. मात्र, ते पोट निवडणुकीत पराभूत झाले. श्रीकरणपूर विधानसभा मतदारसंघात त्यांचा पराभव झाला. काँग्रेसच्या रुपिंदर सिंह कुन्नर यांनी तब्बल ११ हजार २६१ मतांनी त्यांचा पराभव केला.

विशेष बाब अशी की आमदार होण्यापूर्वीच सुरेंद्र पाल सिंह टीटी यांना भाजप सरकारमध्ये राज्यमंत्री करण्यात आलं. राजस्थानच्या इतिहासात हे पहिल्यांदाच घडलं. नोव्हेंबरमध्ये झालेल्या राजस्थान विधानसभा निवडणुकीत काँग्रेस उमेदवाराचा मृत्यू झाला. त्यामुळे श्रीकरणपूर मतदारसंघाची निवडणूक पुढे ढकलण्यात आली होती. पुढं विधानसभेच्या निवडणूकीनंतर ही निवडणूक पार पडली. भाजपने काँग्रेसच्या हातून राजस्थान हिसकावून घेतलं. त्या पराभवाचा वचपा म्हणून या निकालाकडे पाहिलं जातंय. या विजयानंतर रुपिंदर कुन्नर भावूक झाले. वडील गुरमीत यांच्या फोटोसमोर डोकं टेकवताना त्यांचे अश्रू अनावर झाले. माजी मुख्यमंत्री अशोक गेहलोत आणि काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष गोविंद सिंग दोतासरा यांनी कुन्नर यांचं अभिनंदन केलं. जनादेश भाजपच्या हुकूमशाहीला चपराक असल्याचं ते म्हणतायेत. त्याचवेळी भाजपचे प्रदेशाध्यक्ष सीपी जोशी यांनी प्रतिक्रिया दिलीये. त्यांनी पराभवाच्या कारणांचा आढावा घेणार असल्याचं सांगितलं.

डॉ. भीमराव आंबेडकर शासकीय पीजी महाविद्यालयात मतमोजणी करण्यात आली. या जागेसाठी ५ जानेवारीला मतदान झालं होतं. निवडणूक जिंकण्यापूर्वीच ही जागा चर्चेत होती. भाजपचे उमेदवार सुरेंद्रपाल सिंह टीटी यांची भजनलाल सरकारमध्ये मंत्री म्हणून नियुक्ती झाली. तेव्हापासून ही चर्चा सुरु होती. सुरेंद्रपाल सिंह मंत्रीपदावर राहणार की नाही याचा निर्णय होणार होता. या निवडणुकीच्या निकालाकडे संपूर्ण राज्याचं लक्ष लागलं होतं. १८ फेऱ्यांमध्ये मतमोजणी पूर्ण झाली. पहिल्या दोन फेऱ्यांमध्ये ते पुढे होते. पण तिसऱ्या फेरीपासून मागे पडू लागले. आमदार होण्यापूर्वी त्यांना भजनलाल सरकारमध्ये राज्यमंत्री पद देण्यात आलं होतं. त्यांना चार महत्त्वाची खातीही देण्यात आली होती. याप्रकरणी काँग्रेस नेत्यांनी निवडणूक आयोगाकडे आचारसंहिता भंगाची तक्रार केली होती. भाजप सत्तेत आल्यानंतर भजनलाल सरकारची ही पहिलीच मोठी परीक्षा होती. यात काँग्रेसने यश मिळवलं.

विधानसभा निवडणुकीतील पराभवानंतर टीटी आता मंत्री राहणार की नाही, असा प्रश्न उपस्थित केला जातोय. नियमांनुसार कोणताही भारतीय नागरिक आमदार न होता सहा महिने मंत्री राहू शकतो. टीटी यांचा विधानसभा निवडणुकीत पराभव झाला आहे, त्यामुळे मंत्रिपद सोडण्यासाठी भाजप आणि टीटी यांच्यावर नैतिक दबाव असेल, परंतु कायदेशीरदृष्ट्या ते सहा महिने मंत्री राहू शकतात. सध्या त्यांना मंत्री होऊन केवळ ८ दिवस झालेत. त्यांनी अद्याप पदभारही स्वीकारला नव्हता. टीटीला मंत्रिपदावर कायम ठेवायचे की नाही हे सर्व काही भाजप नेतृत्वावर अवलंबून असेल.

# सवलतीत ऑनलाईनची वीजबिल भरण्याची सुविधा

## परिमंडलातील सव्वापाच लाख ग्राहक महावितरणच्या कार्यालयात न जाता ऑनलाईन पध्दतीने भरतात वीजबिल



**दि.१० विदर्भ प्रजासत्ताक अमरावती** महावितरणच्या अमरावती परिमंडलातील वीज ग्राहक सवलतित ऑनलाईन वीजबिल भरण्याला पसंती देत असून डिसेंबर महिन्यात ८ लाख १८ हजार ग्राहकापैकी ५ लाख २७ हजार २१९ ग्राहकांनी महावितरणच्या कार्यालयात न जाता ऑनलाईन पध्दतीनेच ८२ कोटी ७१ लाख रूपयाचे वीजबिल भरले आहे. ग्राहकाची वेळ आणि पायपीट वाचविणाऱ्या महावितरणच्या ऑनलाईन सुविधेचा वीज ग्राहकांनी लाभ घेण्याचे आवाहन अमरावती परिमंडलाचे मुख्य अभियंता ज्ञानेश कुलकर्णी यांनी केले आहे.


डीजीटल इंडीया इनिशिएटीव्हचा भाग म्हणून महावितरणच्या ग्राहकांना ऑनलाईन वीज बिल भरण्याची सोय उपलब्ध करून देण्यात आलेली सुविधेत ग्राहकांनी ऑनलाईन पध्दतीने देयकाचा भरणा केल्यास बिल रकमेच्या ०.२५ टक्के (जास्तीत जास्त रु. ५००/-) इतकी सवलत देण्यात आलेली आहे.याशिवाय मुख्य अभियंता यांच्या मार्गदर्शनात वरिष्ठ व्यवस्थापक वित्त व लेखा विभाग विजय पचारे यांच्या पुढाकाराने महावितरणच्या सर्वच ग्राहकांनी ऑनलाईन वीज बिल भरावे यासाठी प्रयत्न करण्यात येत आहे.परिमंडलात लघुदाब वर्गवारीतील ८ लाख १८ हजार ४९ ग्राहकांपैकी ६४ टक्के ग्राहक ऑनलाईन वीज बिल भरतात. त्यापैकी ३ लाख ७ हजार ३१६ ग्राहक अमरावती जिल्ह्याचे ,२ लाख १९ हजार ९०३ ग्राहक यवतमाळ जिल्ह्याचे असुन त्यांनी अनुक्रमे ५० कोटी ३० लाख व ३२ कोटी लाख रूपयाचा ऑनलाईन पध्दतीने भरणा केला आहे. परंतू अजुनही वीजबिल भराणा केंद्रावर रांगेत उभे राहून वीजबिल भरणाऱ्या उर्वरीत ३६ टक्के ग्राहकांनी महावितरणच्या ऑनलाईन सुविधेचा लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. महावितरणच्या मोबाईल पद्वारे तसेच www.mahadiscom.in या संकेतस्थळावर केव्हाही व कुठूनही ऑनलाईन पध्दतीने विनामर्यादा वीजदेयकाचा भरणा करता येऊ शकते. महावितरणच्या मोबाईल पवर ग्राहक मागील वीज बिल बघू शकतात.तसेच ग्राहकांचे मीटर रिडींग न झाल्यास मोबाईल पद्वारे रिंडीग पाठविण्याची सुविधा आहे.मोबाईल प नोंदणी करतांना मोबाईल नंबर रजिस्टर केल्या जात असल्यामुळे ग्राहकांना वीजबिल तसेच वीज पुरवठ्याशी संबंधीत मेसेजेस दिल्या जाते.तसेच मोबाईल पद्वारे ग्राहकांना तक्रार दाखल करण्याची सुविधाही उपलब्ध आहे. याशिवाय महावितरणच्या ऑनलाईन वीजबिल प्रणालीची कार्यपध्दती महावितरणच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. या पध्दतीत ग्राहक वीजदेयकाचा भरणा क्रेडिट/डेबिटकार्ड, नेटबँकींग व युपीआय इत्यादी इलेक्ट्रॉनिक माध्यमामार्फत करू शकतो. तसेच भारत बिल पेमेंट मार्फत देखील वीज बिल भरणा करता येऊ शकतो. या व्यतिरिक्त महावितरणने रु.५,०००/- पेक्षा जास्त बिल असणाऱ्या सर्व लघुदाब ग्राहकांना RTGS/NEFT द्वारे देयक भरण्याची सुविधा उपलब्ध करून दिलेली आहे.क्रेडिट कार्ड वगळता इतर सर्व पध्दतीने वीजबिल भरणा निशुल्क आहे. तसेच ऑनलाईन पध्दतीने देयकाचा भरणा केल्यास बिल रकमेच्या ०.२५ टक्के (जास्तीत जास्त रु. ५००/-) इतकी सवलत देखील देण्यात आलेली आहे. ऑनलाईन पध्दतीने वीजदेयकाचा भरणा करणे अत्यंत सुरक्षित असून या पध्दतीस रिझर्व बँकेच्या पेमेंट व सेटलमेंट कायदा २००७ च्या तरतूदी लागू आहेत.

### ऑनलाइन पेमेंट कुठे करावे

विद्युत बिलाचा ऑनलाईन भरणा करण्याकरीता महावितरण संकेतस्थळ: http://www.mahadiscom.in ला भेट देणे गरजेचे आहे.तसेच महावितरण मोबाईल ऍप वरून देखील ग्राहकांना ऑनलाईन वीज बिल भरता येते.महावितरण मोबाईल ऍप Mahavitran Google Play store वर उपलब्ध आहे.

# वंदना के स्वरो मे एक स्वर मेरा मिला लो !

## श्रीरामजन्मभूमी आंदोलनाचा भाव



अयोध्या येथील श्रीरामजन्मभूमी वर उभारल्या जात असलेले भव्य श्रीराम मंदिर 'राष्ट्र मंदिर' म्हणून मानले जाईल. कारण या मंदिरासाठी संपूर्ण देशातील प्रत्येक भूभागाचे आणि प्रत्येक समाज घटकांचे योगदान आहे.राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या प्रेरणेने विश्व हिंदू परिषदेने या आंदोलनाचे नेतृत्व केले. पण आंदोलनाच्या यशस्वीतेच्या प्रत्येक टप्प्यावर संघ किंवा विहिंपने श्रेय लाटण्याचा प्रयत्न कधीच केला नाही. विजयाच्या प्रत्येक टप्प्यावर हा समग्र हिंदू समाजाचा विजय, ही भावना संघ आणि विहिंप यांनी मांडली. ✻कवडीचे योगदान नसताना बोलघेवडे श्रेय लाटण्यासाठी भडकाऊ विधाने करत होते. आम्ही होतो, आम्ही होतो, म्हणणारे आणि स्वतःची पाठ थोपटवून घेणारे कमी नाहीत. पण संघ, विहिंप किंवा विचार परिवार कधीही आपल्या ध्येयापासून ढळले नाही. एका संघटनेला श्रेय मिळण्या पेक्षा समग्र हिंदू समाजाची एकता महत्वाची आहे. मंदिर हे निमित्त आहे पण राष्ट्रीय अस्मितेचे जागरण महत्वाचे आहे.

मर्यादापुरुषोत्तम श्रीरामाने आपल्या प्रवासात सर्व समाजघटकांना असुरी शक्तींविरोधात संघटित केले. समाजातील उच्च - नीच दरी संपवली. हेच सामाजिक समरसतेचे ध्येय आंदोलनाच्या प्रत्येक टप्प्यावर दिसत होते.

म्हणूनच कारसेवेच्या वेळी सर्व समाजघटक एकत्र आले. ✻श्रीरामजन्मभूमी मंदिराचा शिलान्यास एका मागासवर्गीय दाम्पत्याच्या हस्ते झाला. सर्व मागास वस्त्या, झोपडपट्टी, वनवासी लोकांचे पाडे, भटक्या विमुक्तांचे तांडे अशा सर्व ठिकाणी श्रीराम शीलापूजन उत्साहात झाले.

गावोगावच्या विटा अयोध्येला पाठवण्यात आल्या. श्रीराम महायज्ञात वंचित - पीडितांना यजमान म्हणून स्थान देण्यात आले.न्यायालयाने श्रीरामजन्मभूमी मंदिराचा मार्ग मोकळा केल्यानंतरही ही चळवळ थांबली नाही. मंदिरासाठी लागणाऱ्या निधीत समाजातील शेवटच्या माणसाचाही खारीचा वाटा असला पाहिजे हे धोरण ठरले. वास्तविक पाहता आजचे देशातील वातावरण पाहता दोन चार उद्योगपतींनीच मंदिराला हवा तेवढा निधी देऊन टाकला असता. पण तसे न करता. प्रत्येक घरातून फुल नाही तर किमान फुलांची पाकळी तरी आली पाहिजे. 'वंदना के इन स्वरो में एक स्वर मेरा मिला लो' हा भाव देशभर जागविला गेला. दुर्दैवाने हिंदू हृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे यांचे पुत्र उद्धव ठाकरे आणि त्यांचे प्रवक्ते संजय राऊत यांनी देखील लोकआस्थेची टर उडवली. श्रीरामजन्मभूमी मंदिर निधी संकलनाला त्यांनी खंडणी म्हणून हिणवले. असो, जशी ज्याची दृष्टी तशी त्याची सृष्टी !या आंदोलनातील एक नवा इतिहास बघा. अयोध्येतील प्रभू श्रीरामाच्या भव्यदिव्य मंदिराची उभारणी देशभरातील तब्बल १२ कोटी ७३ लाख ४ हजार कुटुंबांनी दिलेल्या आर्थिक योगदानातून केली जात आहे. ५ लाख ३७ हजार १९ गावांमधून त्यासाठी निधी संकलन करण्यात आले होते. १५ जानेवारी ते २७ फेब्रुवारी २०२१ दरम्यान २२ लाख कार्यकर्त्यांनी हा निधी गोळा केला होता.✻ कोणतीही संस्था वा कंपनीकडून आर्थिक योगदान घ्यायचे नाही, व्यक्ती म्हणूनच देणगी स्वीकारायची हे तत्त्व पहिल्या दिवशीपासून स्वीकारण्यात आले होते. यात आलेला एकेक रुपया महत्वाचा आहे. कारण त्या रुपयामागे श्रद्धा दडली आहे. तो मंदिराच्या निर्माणात केलेला सहयोग आहे.

श्रीरामजन्मभूमी आंदोलनात महत्वाची भूमिका बजावलेल्या मान्यवरांना आयोजक विसरलेले नाहीत. या संपूर्ण परिसराचे संचालन करणाऱ्या भवनाला अयोध्या आंदोलनाचे महानायक अशोक सिंघल यांचे नाव देण्यात आले आहे. प्रत्येक नगरात १२ हजार लिटर पाण्याची व्यवस्था केली आहे. भोजनाची स्वतंत्र व्यवस्था करण्यात येत आहे. चार हजारावर संतमहंतांच्या निवासाची व्यवस्था या ठिकाणी आहे. १४०० खोल्या तयार करण्यात आल्या आहेत.

तीर्थक्षेत्रपुरममध्ये सुसज्जतातीर्थक्षेत्र पूरमची उभारणी करण्यात आली आहे. ही एक टेंट सिटी आहे. शेकडो तंबू या ४५ एकर परिसरात उभारण्यात आले आहेत. एकूण सहा नगरांची उभारणी करण्यात आली असून या नगरांना परमहंस रामचंद्र दास, गोरक्ष पीठाधीश्वर महंत अवैद्यनाथ, बाबा राम अभिलाष दास, वामदेव जी महाराज, मोरोपंत पिंगळे आणि ओंकार भावे यांची नावे देण्यात आली आहेत.

शेकडो वर्षांनंतर हिंदू समाज हा प्रदीर्घ लढा जिंकला. कोट्यवधी हिंदूंच्या आस्थेचा तो विजय होता. म्हणूनच हे नवनिर्मित राम मंदिरच नव्हे तर ते 'राष्ट्र मंदिर' म्हणून आकाराला येईल, असा विश्वास आहे.



**शिवराय कुळकर्णी**
प्रवक्ता, भाजपा, महाराष्ट्र
९८८१७१७८२७




## रिकाम्या पोटी प्या आवळ्याचा रस; अनेक गंभीर समस्यांपासून होईल सुटका

*दि.९विदर्भ प्रजासत्ताक आवळा आरोग्यासाठी खूप फायदेशीर समजला जातो. आवळ्याच्या रसात व्हिटॅमिन सी, कॅल्शियम, आयरन ,अँटीऑक्साइड भरपूर प्रमाणात असते. त्यामुळे आवळ्याला औषधाचा दर्जा देण्यात आलेला आहे. आवळ्याचा रस आपण घरच्या घरी बनवूनसुद्धा घेऊ शकतो. आवळा पचनसंस्थेसाठी फायदेशीर आहे. अशा वेळी रिकाम्या पोटी आवळ्याच्या रसाचे सेवन केले तर त्याचे अनेक फायदे होतील.*



***१. साखर ते युरिक ऍसिडसाठी फायदेशीर–*** *आवळ्याचा रस नियमितपणे रिकामी पोटी घेत असल्याने शरीर डिटॉक्स करते. आवळ्यामध्ये व्हिटॅमिन सीचे प्रमाण असते. त्यामुळे रोगप्रतिकारशक्ती मजबूत राहण्यास मदत होते आणि रक्तातील साखरेचे प्रमाण व यूरिक ऍसिड कमी होते. रक्तामध्ये गोठलेली चरबी कमी करण्यासाठी आवळा फायदेशीर आहे. यासाठी रोज सकाळी रिकाम्या पोटी कोमट पाण्यात सेवन केले पाहिजे.*

***२. त्वचेवरील डाग कमी करण्यासाठी फायदेशीर–*** *आवळ्यामुळे त्वचेच्या समस्या दूर होण्यास मदत होते. तुम्ही दररोज रिकाम्या पोटी आवळ्याचा रस पिऊ शकता किंवा चेहऱ्यावर तो रस लावू शकता. त्यामुळे चेहऱ्यावरील काळे डाग कमी होतात.*

***३. केसांना काळे करते–*** *आवळा केसांसाठी अनेक प्रकारे फायदेशीर आहे. केसांना मजबूत करण्यासाठी आवळ्याचा वापर करतात. तसेच जर पांढरे केस काळे करायचे असेल तर आवळ्याचा वापर उपयोगी ठरेल. त्यासाठी केसांना आवळ्याचा रस लावा आणि एक ते दोन तास राहू द्या. त्यानंतर साध्या पाण्याने धुवा असे केल्याने केस काही दिवसांत मजबूत आणि काळभोर होतील.*

***४. दृष्टी सुधारण्यासाठी–*** *डोळ्यात जर जळजळ असेल, खाज येत असेल, पाणी येणे यांसारख्या समस्या दूर करण्यासाठी तुम्ही आवळ्याचा वापर करू शकता. तसेच रोज रिकाम्या पोटी आवळ्याचा रस पिल्याने या समस्या दूर होतील आणि तुमच्या दृष्टीत सुधारणा होईल.*

***५. या आजारांसाठी आवळ्याचा रस फायदेशीर आहे–*** *खोकला, ताप, जुलाब, अपचन, मोतीबिंदू, नाकातून रक्त येणे, कावीळ कुष्ठरोग, बद्धकोष्ठता इत्यादी आजारांपासून बचाव करण्यासाठी रोज सकाळी रिकाम्या पोटी आवळ्याचा रस घेणे खूप फायदेशीर आहे.*

# अस्मानी, सुल्तानी संकटाचे ११४० बळी; दर आठ तासात एक शेतकरी आत्महत्या

**दि.१० विदर्भ प्रजासत्ताक अमरावती** – महाराष्ट्र शेतकरी आत्महत्यामुक्त करू, अशी घोषणा मुख्यमंत्र्यांनी सत्ता स्थापनेच्या पहिल्याच दिवशी केली होती. मात्र, शेतकरी आत्महत्यांचे सत्र थांबलेले नाही. पश्चिम विदर्भात २०२३ मध्ये म्हणजेच ३६५ दिवसांत तब्बल ११४० शेतकऱ्यांनी मृत्यूला कवटाळले आहे. राज्यात सर्वाधिक शेतकरी आत्महत्या पश्चिम विदर्भात झाल्या आहेत. हे सर्व शेतकरी अस्मानी अन् सुलतानी संकटाचे बळी ठरले आहेत.



पश्चिम विदर्भात दर दिवशी तीन म्हणजेच दर आठ तासांत एक शेतकरी मृत्यूचा घोट घेत असल्याचे विदारक चित्र आहे. याची कारणे शोधण्यासाठी तत्कालीन कृषिमंत्री अब्दुल सत्तार मुख्यमंत्र्यांच्या सूचनेनुसार एक दिवस अमरावती जिल्ह्यात मेळघाटातील आदिवासीबहुल शेतकऱ्याच्या घरी एक दिवस मुक्कामी राहिलेत. त्यानंतर त्यांनी शेतकरी आत्महत्याप्रवण १४ जिल्ह्यांतील जिल्हाधिकारी व अन्य अधिकाऱ्यांना 'एक दिवस बळीराजासाठी' हा कार्यक्रम दिला व शेतकरी आत्महत्या होण्यामागची कारणे व अहवाल मागितला. शासनाचा उद्देश चांगला असला तरी अभियान मात्र फोटोसेशनपुरते मर्यादित राहिले.

पश्चिम विदर्भात गेल्या वर्षभरात ११४० शेतकरी आत्महत्या झालेल्या आहेत. यामध्ये शासन मदतीसाठी ५१७ प्रकरणे पात्र ठरली. याशिवाय ३१७ प्रकरणे शासन मदतीसाठी अपात्र ठरविण्यात आलेली आहेत, तर ११ महिन्यांपासून तब्बल २३५ प्रकरणे चौकशीसाठी प्रलंबित असल्याने शासन-प्रशासन याविषयी गंभीर नसल्याचा आरोप होत आहे.

### सन २००१ पासूनची स्थिती

- आतापर्यंत शेतकरी आत्महत्या : २०,००६
- शासन मदतीसाठी पात्र प्रकरणे : ९,३७३
- आतापर्यंत अपात्र प्रकरणे : १०,३९८
- चौकशीसाठी अद्याप प्रलंबित : २३५
- शेतकरी आत्महत्यांची प्रथमदर्शनी कारणे
- १) विभागीय आयुक्त कार्यालयाच्या माहितीनुसार पश्चिम विदर्भात जानेवारी महिन्यात १०३, फेब्रुवारी ७३, मार्च १०३, एप्रिल ८६, मे १०६, जून ९६, जुलै ८६, ऑगस्ट १०१, सप्टेंबर १०७, ऑक्टोबर १०४, नोव्हेंबर ८७, डिसेंबरमध्ये ८८
- २) शेतकरी आत्महत्या होण्यामागे नैसर्गिक आपत्ती, दुष्काळ, नापिकी, बँकांचे व खासगी सावकारांचे कर्ज, कर्ज वसुलीसाठी तगादा, मुलीचे लग्न, आजारपण व यासह इतर बाबींमुळे येणारा मानसिक तणाव कारणीभूत आहे.

कोणत्याही शंका किंवा अभिप्रायासाठी आम्हाला ईमेल करा -prajasattaknews24gmail.com
या पृष्ठावरील जाहिरातींसाठी किंवा मोफत अंक मो.वर मिळण्यासाठी संपर्क मो.८६२४९८५६३३, प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर

## प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेंतर्गत

# बंधनकारक केलेल्या बाबींची पूर्तता करण्याचे आवाहन

**दि.१० विदर्भ प्रजासत्ताक अमरावती** – राज्याच्या भूमी अभिलेख नोंदीनुसार जमिनीचा तपशील अद्ययावत न केलेल्या, बँक खाती आधार संलग्न व ई-केवायसी न केलेल्या शेतकऱ्यांचा योजनेच्या लाभासाठी समावेश करण्यास अद्यापही वाव असल्याने केंद्र शासनाच्या निर्देशानुसार दिनांक ६ डिसेंबर, २०२३ ते १५ जानेवारी, २०२४ या कालावधीत गावपातळीवर ४५ दिवसांची विशेष मोहिम राबविण्यात येत आहे. या अनुषंगाने डॉ. प्रवीण गेडाम आयुक्त कृषी यांनी महसूल, ग्रामविकास व कृषी या विभागांनी सर्व समन्वयाने राज्यातील पात्र शेतकऱ्यांना पी. एम. किसान योजनेत समाविष्ट करण्यासाठी या विशेष मोहिमेची यशस्वी अंमलबजावणी करण्याचे निर्देश दिले आहेत. या मोहिमेमध्ये लाभार्थींची स्वयं नोंदणी व शघधउ साठी राज्यातील सर्व सामाईक सुविधा केंद्र (उडउ) तर आधार संलग्न बँक खाती उघडण्यासाठी इंडिया पोस्ट पेमेंट बँक यांनाही सहभागी करण्यात आले आहे.

शेतक-यांना निश्चित उत्पन्न मिळण्याकरीता केंद्र शासनाने प्रधानमंत्री किसान सन्मान निधी (झच् घखड-छ) योजना सुरु केली आहे. या योजने अंतर्गत सरसकट सर्व पात्र शेतकरी कुटुंबास (पती, पत्नी व त्यांची १८ वर्षाखालील अपत्ये) रु. २०००/- प्रती हप्ता या प्रमाणे तीन समान हप्त्यात प्रती वर्षी रू. ६०००/- लाभ अदा करण्यात येत आहे. लागवडीलायक क्षेत्रधारक, बँक खाती आधार संलग्न व योजनेचे शघधउ केलेले शेतकरी कुटुंब पी. एम. किसान योजनेच्या लाभासाठी पात्र आहेत.




पी.एम.किसान योजनेच्या लाभासाठी बंधनकारक केलेल्या बाबींची पूर्तता केलेल्या लाभार्थींनाच योजनेचा लाभ केंद्र शासन अदा करत आहे. त्यामुळे भूमी अभिलेख नोंदीनुसार (ठेठ नुसार) जमिनीचा तपशील अद्ययावत न केलेल्या, बँक खाती आधार संलग्न व ई-केवायसी न लाभार्थींनी सदर बाबींची पूर्तता करून घ्यावी. यामध्ये भूमी अभिलेख नोंदी अद्ययावत नसलेल्या (डरपव डशशवळपस – छे) लाभार्थींनी संबंधित तलाठी / तहसील कार्यालयामध्ये संपर्क साधावा. त्याचप्रमाणे शघधउ व बँक खाती आधार संलग्न करणे यासाठी अनुक्रमे नजीकच्या सामाईक सुविधा केंद्र (उडउ) व इंडिया पोस्ट पेमेंट बँक (खझझइ) च्या मार्फत कार्यपूर्तता करावी. तसेच आवश्यकतेप्रमाणे पूर्तता करण्यासाठी गावच्या ग्रामस्तरीय नोडल अधिकारी / कृषी सहाय्यक यांची मदत घ्यावी.

पी. एम. किसान योजनेचा १६ वा हप्त्याचा लाभ जानेवारी महिन्यात वितरीत करण्याचे केंद्र शासनाचे नियोजन आहे. योजनेसाठी नोंदणी करणे, ई-केवायसी करणे, बँक खाती आधार क्रमांकास जोडणे या बाबींची पूर्तता योजनेचा १६ वा हप्ता वितरणापूर्वी शेतकऱ्यांनी स्वत: करावयाची आहे. यास्तव पी. एम. किसान योजनेच्या निकषांच्या अधिन राहून योजनेच्या लाभासाठी आवश्यक बाबींची पूर्तता करून घेण्याचे आवाहन राज्यातील सर्व शेतकरी बांधवांना करण्यात येत आहे. अधिक माहितीसाठी नजिकचे कृषी सहाय्यक/कृषी पर्यवेक्षक/ मंडळ कृषी अधिकारी/तालुका कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क करावा, असे आवाहन दिलीप झेंडे, कृषी संचालक (विस्तार व प्रशिक्षण) कृषी आयुक्तालय,पुणे यांनी केले आहे.

# बहिरम येथे रंगला नेत्रदीपक रिंगण सोहळा

## कर्नाटकच्या शितोळे सरकारच्या दोन अश्वांचा सहभाग



### हजारो भाविकांची उपस्थिती

**दि.१०विदर्भ प्रजासत्ताकचांदूरबाजार :-** श्रीक्षेत्र बहिरम येथील यात्रेत ३ जानेवारीपासून सुरू असलेल्या शिवपुराण, भावार्थ रामायणसारख्या आध्यामिक कार्यक्रमानंतर मंगळवार, ९ जानेवारी रोजी दुपारी १२ वाजता हजारो भाविकांनी पंढरपूर वारीतील रिंगण सोहळा येथे प्रत्यक्ष अनुभवला. या रिंगण सोहळ्यासाठी कर्नाटकातील अंकली येथील शितोळे सरकारचे दोन अश्व दाखल झाले होते.

रिंगण सोहळा सुरू होण्यापूर्वी दोन्हीअश्वांनी बहिरम बाबांचे दर्शन घेतले. या सोहळ्यासाठी काशी तलाव परिसरातील दोन एकर परिसरात रिंगण तयार करण्यात आले होते. या नेत्रदीपक सोहळ्यात वाशिमसह इतर ठिकाणावरुन ४० दिंड्या सहभागी झाल्या होत्या. सर्वच वारकरी पांढऱ्या शुभ्र वेशात उपस्थित होते. तर अश्वसुद्धा पांढरे शुभ्र असल्याने रिंगणाचा

संपूर्ण परिसर सजला होता. या सोहळ्याचा आनंद घेण्यासाठी यात्रेकरूंसह हजारो भाविक व वारकरी यांची उपस्थिती होती. यात महिला वारकऱ्यांचाही मोठ्या संख्येने सहभाग होता.श्री बहिरम बाबा संस्थानच्या वतीने ३ जानेवारीपासून अखंड हरिनाम सप्ताहाच्या आयोजनात शिवपुराण, भावार्थ रामायण, विचारसागर, दैनिक कीर्तन, माऊलीचा रिंगण सोहळा, तीर्थस्थापना, जयगुरुदेव सत्संग, काकडा आरती, गाथा, भजन, हरिपाठ, हरिकिर्तन असे विविध धार्मिक कार्यक्रम पार पडले.

# संपाच्या भीतीने केल्या टाक्या फुल्ल, आता होत आहे पश्चात्तापआर्थिक चक्रही बिघडले

**दि.१०विदर्भ प्रजासत्ताक अमरावती–** : नवीन 'हिट एंड रन' कायद्याच्या विरोधात मालवाहतूकदार आणि ट्रकचालकांनी पुकारलेल्या संपाने संपूर्ण देशभरात खळबळ उडाली होती. केंद्राच्या माघारीनंतर हा संप मिटला. मात्र, या संपामुळे पेट्रोल विक्रीतील अनपेक्षित चढ-उतार अनुभवास आला. १ ते ३ जानेवारी दरम्यान अक्षरशः दुप्पट, तिप्पट झालेली पेट्रोलविक्री ५ ते ९ जानेवारीदरम्यान अर्ध्यावर आली.

पेट्रोल पंप डोलर्स असोसिएशनचे अध्यक्ष सौरभ जगताप यांनी सांगितले, जिल्हाभरातील ८० ते ८५ पेट्रोल पंप मिळून दिवसाकाठी अंदाजे पाच लाखलिटर पेट्रोल विक्री झाली. संपामुळे पेट्रोल मिळणार नसल्याच्या भीतीने १ ते ३ जानेवारी तीन दिवसांत ही विक्री दुप्पट झाली. सामान्य स्थितीत डिझेलची विक्री दिवसाकाठी सरासरी २.५० लाख लिटर होते. ही स्थिती मागणी-पुरवठा गणित बिघडविणारी ठरली. संप मागे घेतल्यानंतर ५ ते ९ जानेवारी दरम्यान आकडे पुन्हा खाली गेले. वाहनचालकांनी गरज नसताना आगाऊ पेट्रोल भरून घेतल्यामुळे आता पंपांवरील गर्दी ओसरली आहे.



### अती उत्साही पणा आणि आता पश्चाताप

संपामुळे पेट्रोलचा पुरवठा होणार नसल्याच्या भीतीपोटी अनेकांनी दुचाकी आणि चारचाकीच्या टँक फुल्ल करून घेतल्या. प्रत्यक्षात दोन दिवसांतच संप थंडावल्याने मात्र काहींना जादा पेट्रोल खरेदीचाही पश्चात्ताप झाला.

# जिल्हाध्यक्ष बबलु देशमुख व आ.बळवंत वानखडे यांच्या पुढाकाराने उपोषण कर्त्यांना मिळाला न्याय

## पाच दिवस सुरू असलेल्या गाव पातळीवर आमरण उपोषण कर्त्यांना दिलासा

**दि.१०विदर्भ प्रजासत्ताक चांदुर बाजार:-** मौजा चिंचोली , जावरा व उदापूर शिवारातून खाजगी मालकीचे तसेच शासकीय जमीनीवरील अवैध गौण खनिज उत्खननाबाबत व त्याची वाहतुक मोठ्या प्रमाणात होत असल्याने गावातील रस्ते पूर्णतः उखडले असल्याने त्याविरोधात मौजा चिंचोली ( ब्रा . थडी ) येथील शेतकरी , नागरीकांनी यांनी गाव पातळीवर एक कृती समिती तयार करून या मार्गावरून अविध्यरीत्या वाहतूक करणाऱ्या ट्रक मालक विरोधात आंदोलन सुरू करून ४ जानेवापासून बेमुदत आमरण उपोषन केले असल्याने सदर आमरण उपोषणाला जिल्हा काँग्रेस कमिटी अध्यक्ष बबलु देशमुख व आ. बळवंत वानखडे यांनी आमरण कर्त्यांच्या न्यायासाठी घेतलेल्या रोख ठोक भूमिकेने तहसीलदार गीतांजली गरड यांनी तात्काळ उपोषस्थळी येवून काँग्रेस जिल्हाध्यक्ष बबलु देशमुख व आ. बळवंत वानखडे यांच्या नेतृत्वातील मध्यस्तीने उपोषण कर्त्यांना लेखी पत्र देवून काँग्रेस जिल्हाध्यक्ष बबलु देशमुख यांनी निंबु सरबत देवून उपोषण सोडविण्यात आले.ट्रक मालकाच्या मनमानी कारभारामुळे गावकऱ्यांना योग्य न्याय मिळाला नसल्याने चिंचोली (ब्राम्हणवाडा थडी)येथील गाव पातळीवरील कृती समितीने न्याय मिळेपर्यंत आमरण उपोषणाला ४जानेवारी पासून सुरुवात केली होती .जावरा , उदापूर येथील शासकीय जमीनीतून व गट क्रमांक ८ ९ ( जावरा ) उदापूर येथील ८० व ८१ या खाजगी मालकीच्या शेतीतून सपाटी करण्याच्या नावाखाली नियमबाह्य खनिजांचे उत्खनन करण्यात आले होते . तसेच जावरा येथील शासकीय जमीन गट क्रमांक ९ १ यामधून सुध्दा अवैध उत्खनन करण्यात आली व त्याची वाहतुक करण्यात आली असल्याने गावातील रस्ते पूर्णतः उखडले असल्याने गावातील नागरिक तसेच शेतकरी हतबल झाले होते.या सर्व त्रासापासून वाचण्यासाठी तसेच योग्य न्याय मिळेपर्यंत गावकऱ्यांनी कृती समिती तयार करून आमरण उपोषणाला सुरुवात केली होती.गावकऱ्यांची मागणी व त्यांना तात्काळ न्याय मिळावा या करीता जिल्हा काँग्रेस कमिटी जिल्हाध्यक्ष बबलु देशमुख व आ. बळवंत वानखडे यांनी पुढाकार घेऊन उपोषण स्थळी आमरण उपोषणाला बसलेल्या सर्व उपोषण कर्त्यांच्या मागण्या समजावून घेऊन तहसीलदार यांच्याशि संवाद साधला त्यावरून तात्काळ तहसीलदार गीतांजली गरड यांनी दि ४जानेवारी पासुन सुरु असलेल्या उपोषणाबाबत . दिनांक ८जानेवारीला उपरोक्त संदर्भीय विषयांचे अनुषंगाने योग्य न्याय देण्यासंदर्भात लेखी पत्र देवून त्यामध्ये दिनांक ०४.०१.२०२४ पासुन चिंचोली बु . येथे उपोषण सुरु आहे . त्यानुषंगाने उत्खनानाचे अनुषंगाने सर्व प्रकारचे अहवाल व पंचनामा मागविण्यात आला असून त्यावर दंडात्मक कार्यवाही करण्याचे अनुषंगाने प्रक्रिया सुरु आहे . तसेच , मौजा जावरा गट क्र . ८९ मध्ये दिनांक २९.११. २०२३ रोजी ३०,०९,३९७.३२ रुपयांचा दंड आकारण्यात आला आहे . तसेच , आपण निवदेनात नमुद रस्त्यावरुन मुरुम उत्खननाचे अनुषंगाने त्या रस्त्यावरून मुरुम वाहतुक बंद करण्यात आली आहे . आणि पिकांचे अनुषंगाने तालुका कृषी अधिकारी यांना पाहणी करुन अहवाल सादर करणेबाबत कळविण्यात आले आहे . या सर्व तक्रारीचे अनुषंगाने सखोल चौकशी करण्यात येत आहे याबाबतचे लेखी पत्र देवून. ४जानेवारी पासुन सुरु असलेले उपोषण मागे घेवून प्रशासनास सहकार्य करावे असे लेखी आश्वासन देत उपोषण मागे घेण्यात आले. गेल्या पाच दिवसांपासून सुरू असलेल्या या आमरण उपोषनाला ग्राम विकास कृती समिती चिंचोली ( बु . ) देवी मंदिर परीसर ब्राम्हणवाडा थडी उपोषणकर्ते हरीभाऊ मा . ढोले , सचिन सु . विंचुरकर , दिपक रु . सायंदे जगदीश रु . कडू, मो.रफीक शेख उसमान ,अंकुश रा . पंडागरे अंकुश रा . सायंदे हे उपोषणाला बसले होते. जिल्हा काँग्रेस कमिटी जिल्हाध्यक्ष बबलु देशमुख व आ.बळवंत वानखडे यांच्या नेतृत्वातील पुढाकाराने उपोषण कर्त्यांना, शेतकरी ,शालेय शिक्षण घेणारे विद्यार्थी,नागरिक यांना योग्य न्याय मिळाला असल्याचे राजाभाऊ उल्हे , बाबूभाई इनामदार यांनी सांगितले.



# शासनाने धोका दिल्यास २६ जानेवारीला जलसमाधी

१५ दिवसात मुख्यमंत्र्यांसोबत बैठकीचे प्रयत्न ;

## जिल्हा प्रशासनाच्या आश्वासनानंतर आंदोलकांचा इशारा

**दि.१०विदर्भ प्रजासत्ताक अमरावती :** मंत्रालयास घेरावासाठी मुंबईकडे कूच करणाऱ्या ३०० वर प्रकल्पग्रस्तांना मंगळवारी सकाळी ११ वाजता मनपा आयुक्त बंगल्यासमोर पोलिसांनी रोखले. त्यामुळे त्यांनी तिथेच ठिय्या दिला. आरडीसी यांच्यासोबत चर्चेदरम्यान १५ दिवसात मुख्यमंत्री यांच्यासोबत बैठकीचे आश्वासन देण्यात आल्याने तूर्त 'मिशन मुंबई' स्थगित करण्यात आले. या दरम्यान शासन-प्रशासनाने धोका केल्यास २६ जानेवारीला अप्पर वर्धा प्रकल्पात जलसमाधी घेण्याचा इशारा आंदोलकांनी दिला.प्रलंबित विविध मागण्यांसाठी अप्पर वर्धा धरणग्रस्त पुनर्वसन कृती समिती, मोर्शीद्वारा तेथील तहसील कार्यालयासमोर आत्मक्लेष आंदोलनाचा २३६ वा दिवस आहे.


मुंबईला जाणाऱ्या ३०० प्रकल्पग्रस्तांनी सोमवारी रात्री जिल्हा कचेरीत ठिय्या दिल्यानंतर रात्रीच १२ चे दरम्यान त्यांना पोलिसांनी ताब्यात घेऊन मोर्शी मार्गावरील एका सभागृहात नेण्यात आले. मंगळवारी सकाळी ११ वाजता जिल्हा कचेरीवर धडकण्यासाठी सर्व आंदोलक निघाले असताना पोलिसांनी रस्त्यातच अडविले व त्याच ठिकाणी त्यांनी ठिय्या दिला. दरम्यान आरडीसी डॉ. विवेक घोडके यांच्यासोबत सकारात्मक चर्चा झाली.

यावेळी मुख्यमंत्री यांच्यासोबत बैठकीच्या अनुषंगाने जिल्हा प्रशासनाद्वारा प्रयत्न करणार असल्याचे आश्वासन त्यांना देण्यात आल्याची माहिती कृती समिती सदस्य उमेश शहाणे, अमोल महल्ले यांनी सांगितली.

# विद्यापीठात मुलींच्या वसतिगृहात शिरला बिबट्या

## श्वानाच्या पिलाची शिकार सीसीटीव्हीमध्ये कैद

**दि.१०विदर्भ प्रजासत्ताक अमरावती :** संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठात अधून मधून बिबट्याचा वावर असतो. ५ जानेवारीला त्याने मुलींच्या वसतिगृहात शिरकाव केला आणि श्वानाच्या पिलाची शिकार केली. हा घटनाक्रम सीसीटीव्हीत कैद झाला. यासंदर्भात विद्यापीठ प्रशासनाने वनविभागाला पत्र दिले आहे. विद्यापीठाच्या मागील बाजूस वनविभागाचे विस्तीर्ण जंगल असून तलावदेखील आहे. या तलावावर विविध प्रजातींचे वन्यप्राणी, पक्षी तृष्णा भागविण्यासाठी येतात. नेमकी हीच बाब हेरून शिकारीसाठी बिबट्यांचा तलाव आणि विद्यापीठ परिसरात संचारअसतो. याच भागातून चार ते पाच वर्षांपासून विद्यापीठात बिबट्याचे दर्शन होते. बिबट्यापासून कोणालाही इजा वा धोका होऊ नये, यासाठी विद्यापीठाने परिसरातील महत्त्वाच्या ठिकाणी 'अलर्ट' म्हणून फलक लावलेले आहेत. मात्र, गत आठवड्यात शुक्रवारी मुलींच्या वसतिगृह क्रमांक १च्या आत शिरकाव करून त्याने श्वानाच्या पिल्लाची शिकार केल्यामुळे कर्मचारी, विद्यार्थिनीं मध्ये प्रचंड दहशत निर्माण झाली आहे.



### कुलगुरू बंगला, मुलींचे वसतिगृह परिसर बिबट्याचे भ्रमंती मार्ग

विद्यापीठात कुलगुरूंचा बंगला, शारीरिक शिक्षण विभागाचे कार्यालय, रसायनशास्त्र विभाग परिसर आणि मुलींचे वसतिगृह क्रमांक १, २ आणि ३ हा भाग बिबट्याचे भ्रमंती मार्ग असल्याचे सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झालेल्या हालचालींवरून स्पष्ट होते. विद्यापीठ परिसरात दोन बिबटे जोडपी असल्याचे सुरक्षारक्षकांचे म्हणणे आहे

# विद्यार्थी करणार अंतरिक्षाची सफर

## १३ जानेवारीला जि.प. हायस्कूल येथे स्पेस ऑन व्हील्सचे आयोजन

**दि१० विदर्भ प्रजासत्ताक चांदुर रेल्वे** – भारतीय अंतराळ संशोधन संस्था(इस्त्रो) विज्ञान भारती बंगलोर यांच्या सौजण्याने सध्या जिल्ह्यात विविध ठिकाणी फिरते स्पेस ओन व्हील प्रदर्शन आयोजित केले जात आहे. दिनांक १३ जानेवारी रोजी जिल्हा परिषद हायस्कूल चांदूर रेल्वे येथे सकाळी ८ ते सायंकाळी ५ दरम्यान हे फिरते प्रदर्शन उपलब्ध राहणार असून या माध्यमातून विद्यार्थ्यांना अंतरिक्षातील सफर करायला मिळणार आहे.

भारतीय अंतराळ संशोधन संस्था(इस्त्रो), शिक्षण विभाग पंचायत समिती चांदूर रेल्वे, विज्ञान अध्यापक मंडळ व जिल्हा परिषद हायस्कूल चांदूर रेल्वे यांच्या संयुक्त विद्यमाने या फिरते प्रदर्शनचे आयोजन केले आहे. भारतात आतापर्यंत झालेल्या अंतराळ प्रवासाची माहिती, चांद्रयान-१ मोहीम, मंगलयान मोहीम, अवकाशात सोडलेले विविध उपग्रह तसेच इस्त्रोच्या एकूणच आतापर्यंतचा अंतराळ प्रवास या बस मध्ये विद्यार्थ्यांना पहायला मिळणार आहे. चंद्रयान व मंगलयान मोहीम राबविण्याचा वैज्ञानिक दृष्टिकोन, मोहीमेची माहिती तसेच ही मोहीम राबविताना आलेली आव्हाने या संदर्भातील माहिती या फिरत्या बस मधील प्रदर्शनद्वारा मिळणार आहे. तालुक्यातील सर्व शाळांतील विद्यार्थ्यांसाठी हे प्रदर्शन खुले असून हे प्रदर्शन पाहण्याकरिता विभा एप्स वर नोंदणी करावयाची आहे.

अंतरीक्ष महायात्रा प्रदर्शनी च्या निमित्याने जिल्हा परिषद हायस्कूल चांदूर रेल्वे येथे दिनांक ११ जानेवारी रोजी दुपारी १२ ते २ दरम्यान विज्ञान रांगोळी स्पर्धा व दिनांक १२ जानेवारी रोजी विज्ञान पोस्टर स्पर्धाचे आयोजन करण्यात आले. या दोन्ही स्पर्धा दोन गटात राहणार असून पहिला गट इयत्ता ५ ते ८ वी विद्यार्थीसाठी व दुसरा गट इयत्ता ९ ते १२ विद्यार्थ्यांसाठी आहे. स्पर्धा व प्रदर्शन सहभागाकरिता जिल्हा परिषद हायस्कूलचे मुख्यध्यापक गणेश चव्हाण ९८८१८८१७६६, ९५८८४६३२९८ यांचेशी संपर्क करावयाचा आहे.फिरत्या प्रदर्शनचा अनुभव तालुक्यातील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी घेण्याचे आवाहन गटशिक्षणाधिकारी संदीप बोडखे, विज्ञान समन्वयक श्रीनाथ वानखडे, मुख्याध्यापक गणेश चव्हाण व विज्ञान अध्यापक मंडळाचे अध्यक्ष प्रताप बोदीले यांनी केले आहे.




# अचलपुरात दोन जुगार अड्ड्यांवर धाड; दोघे ताब्यात

## माजी नगरसेवकासह अन्य एकाचा समावेश

दि.१०विदर्भ प्रजासत्ताकअचलपूर :स्थानिक पोलिस ठाण्याच्या हद्दीत जुगार अड्यांवर धाड टाकत दोघांना अचलपूर पोलिसांनी ताब्यात घेतले. शहरातील देवडी व चावल मंडी अशा दोन ठिकाणी गोपनीय माहितीच्या आधारे पोलिसांनी धाड टाकली.

अचलपूर नगर परिषदेचे माजी नगरसेवक संजय लीलाराम धमेले (६१, रा. चावल मंडी, अचलपूर) यांना चावल मंडी भागातून ताब्यात घेतले. मुकेरीपुरा येथील मेहमूद खा बिस्मिल्ला खा (४९) याला देवडी भागातून ताब्यात घेण्यातआले. याप्रकरणी अचलपूर पोलिसांनी जुगार कायद्यांतर्गत कारवाई केली.

ठाणेदार सुरेंद्र बेलखेडे यांच्यासह डीबी पथकाचे पुरुषोत्तम बावनेर, नितीन कळमटे, श्रीकांत वाघ, प्यारेलाल जामूनकर यांनी ही कारवाई पार पाडली.

# श्रीराम आणि अयोध्येतील मंदिराच्या नाण्यांची धूम; लाकडी प्रतिकृती विक्रीस

## भक्तांची मोठ्या प्रमाणात खरेदी : श्रीरामाच्या सोने-चांदीच्या फ्रेम, कॉर्पोरेट क्षेत्राकडून मागणी

**दि.१० विदर्भ प्रजासत्ताक अमरावती-** अयोध्येत भगवान श्रीरामाच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा २२ जानेवारीला होणार आहे. या निमित्ताने सर्वच बाजारपेठांमध्ये उत्साह संचारला आहे. श्रीरामाची प्रतिकृती असलेले वस्त्र तयार करण्यात येत आहेत तर पूजेसाठी उपयोगात येणाऱ्या सामग्रीची रेलचेल दिसून येत आहे. अर्थात अमरावती मधील सर्वच बाजारपेठा राममय झाल्या आहेत. २२ जानेवारी हा दिवस दिवाळी म्हणून साजरा करण्याचा लोकांचा मानस



आहे. या निमित्ताने भक्तांमध्ये प्रचंड उत्साह आहे.

बाजारात श्रीराम मंदिराचे लाकडी मॉडेल विक्रीस असून सोने-चांदीचे नाणे, फ्रेम, मूर्ती, धनुष्य विक्रीस असून भक्त मोठ्या प्रमाणात खरेदी करीत आहेत. चांदीच्या एका बाजूला श्री रामाची मूर्ती तर दुसऱ्या बाजूला राम मंदिराच्या मॉडेल तयार केले आहे. याशिवाय श्री रामाचे लॉकेट, अंगठी आदींसह अन्य वस्तूही सराफांकडे विक्रीस आहेत. श्री रामाची प्रतिकृती असलेले सोने आणि चांदीच्या नाण्यांची मोठ्या प्रमाणात विक्री होत आहे. चांदीचे नाणे एक हजार ते १० हजार आणि सोन्याचे नाणे, फ्रेम व अन्य वस्तू ५ हजार ते ५ लाखांपर्यंत विक्रीस आहेत. याशिवाय श्रीराम-सीतेची प्रतिकृती असलेले अलंकार मोठ्या प्रमाणात विकले जात आहेत.

### भेटवस्तूंनाही मोठी मागणी

भगवान श्रीराम-सीता, लक्ष्मण, पवनसूत हनुमानची प्रतिकृती असलेल्या फ्रेम, श्रीरामाच्या पादुका, मंदिराचे चांदीचे मॉडेलला मोठ्या प्रमाणात मागणी आहे. वजनानुसार मॉडेलची किंमत आहे. तसेच रामदरबारची प्रतिकृती असलेले सोने-चांदीचे नाणे उपलब्ध आहेत.

### राममंदिराच्या नाण्यांची मागणी वाढली

आधी दसरा-दिवाळीत भेटस्वरुपात श्रीगणेश आणि लक्ष्मीचे नाणे देण्यात येत होते. पण आता अयोध्येत श्रीरामाच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा होणार असल्याने लोकांमध्ये श्रीराम आणि मंदिराची प्रतिकृती असलेले सोने आणि चांदीचे नाणे भेटस्वरुपात देण्याची चलन वाढली आहे. २२ जानेवारीपर्यंत नाण्याची मागणी आणखी वाढणार असल्याचे सराफा व्यावसायिक सांगत आहे.

# काटआमला - उत्तमसरा रस्त्याचे काम सुरु

## गावकऱ्यांची प्रतीक्षा संपली, नितीन कदम यांचा पाठपुरावा यशस्वी

**दि.१०विदर्भ प्रजासत्ताक अमरावती** गेल्या कित्येक वर्षांपासून ऐरणीवर असलेला काटआमला-उत्तमसरा रस्त्याचा प्रश्न निकाली निघाला आहे. नितीन कदम यांच्या सततच्या पाठपुराव्यामुळे सदर रस्त्याचे बांधकाम अखेर सुरु झाले असून संबंधित काम जलदगतीने व्हावे, याकरिता नागरिक व श्रमिक विशेष काळजी यावेळी घेत आहेत. काट आमाला - उत्तमसरा मार्गावरुन प्रवास करताना प्रवाशांना आपला जीव मुठीत धरुन मार्ग शोधावा लागत होता. एखादा वेळेस आपतकालीन रुग्ण बाहेर घेऊन जायचे असल्यास रुग्णाचा रस्तेवाटेतच मृत्यु होण्याची शक्यता होती. या रस्त्यावर वाहनचालकआणि पादचाऱ्यांना धुळीचा त्रास सहन करावा लागत होता. सदर रस्ता पूर्णपणे खड्डेमय झाला होता. काही वर्षापूर्वी आधीच या रस्त्याचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे आढळून आले होते. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांना उद्योजक व समाजसेवी नितीन कदम यांनी याआधी सूचना केल्या होत्या. येथील दळण - वळण करणाऱ्या नागरीकांना तारेवरची मोठी कसरत करावी लागत होती. आता नितीन कदम यांच्या पाठपुराव्याने रस्त्याचे, बांधकाम सुरु झाले असून लवकरच नागरिकांना वाहतुकीकरिता सोयीस्कर रस्ता उपलब्ध होत आहे.



# बडनेरा बसस्थानकाची समितीने केली पाहणी

**दि१०विक्सर्भ प्रजासत्ताक बडनेरा :** हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे स्वच्छ सुंदर बसस्थानक अभियानांतर्गत राज्य परिवहन यवतमाळ विभागाच्या सर्वेक्षण समितीने सोमवारी बडनेरा बसस्थानकाची पाहणी केली. यादरम्यान त्यांनी बसस्थानकातील कर्मचारी तसेच प्रवाशांसोबत स्वच्छतेसंदर्भात संवाद साधला,

स्पर्धात्मक स्वरूपातील या अभियानात उत्कृष्ट बसस्थानकाला रोख बक्षीस देऊन गौरविण्यात येणार आहे. १ मे २०२३ ते ३० एप्रिल २०२४ पर्यंत



राज्यभरात हे अभियान राबविले जाणार आहे. राज्य परिवहन यवतमाळ विभागाचे विभाग नियंत्रक अमोल गाँजारी, विभागीय कर्मचारी वर्ग अधिकारी सतीश पलेरिया, विभागीय सांख्यिकी अधिकारी संदीप कोडापे यांच्या सर्वेक्षण समितीने बडनेरा बसस्थानकाची पाहणी केली. बसस्थानकातील वर्कशॉप परिसर, चालक-वाहक यांचे विश्रामगृह, नव्याने बांधण्यात आलेली इमारत, शौचालय, पाण्याची व्यवस्था, बसस्थानक आवारातील एकूणच बारीक-सारीक स्वच्छतेसंदर्भात बाबी या समितीने पाहणी करून त्यांच्या सर्वेक्षणात नोंदवून घेतल्या, चालक-वाहक इतर कर्मचारी तसेच प्रवाशांशीदेखील संवाद साधला. यावेळी येथील आगार व्यवस्थापक वैशाली भाकरे, वाहतूक निरीक्षक मनोज मलातपुरे, सहायक वाहतूक अधीक्षक भूमिका वैद्य, वर्कशॉप अधीक्षक राजेश मोरे यांच्यासह इतरही कर्मचारी यादरम्यान हजर होते. ही समिती चार दिवस जिल्ह्यातील बसस्थानकांची पाहणीकरणार आहे.

# २१ जानेवारी रोजी न्यू हायस्कूल मेन शाळेच्या माजी विद्यार्थ्यांची एक दिवसीय शाळा उपक्रमाचे आयोजन

**दि.१० विदर्भ प्रजासत्ताक अमरावती-** अमरावती शहरातील नामांकित न्यू हायस्कूल मेन शाळेच्या शताब्दी समारोह निमित्त माजी विद्यार्थ्यांसाठी एक दिवसाची शाळा हा उपक्रम राबविण्यात येणार असून दिनांक २१ जानेवारी रोजी विभिन्न क्षेत्रातील कार्यरत माजी विद्यार्थी या एक दिवसीय शाळेत उपस्थित राहणार आहेत. या एक दिवसीय शाळेमध्ये १९५० ते २०२३ सालापर्यंतचे विद्यार्थी सहभागी होणार असून नुकतीच त्यासंदर्भात दिनांक ७ जानेवारी रोजी न्यू हायस्कूल मेन शाळेत सभा घेण्यात आली. या सभेत १०० पेक्षा जास्त माजी विद्यार्थ्यांनी उपस्थित राहून सभेचे नियोजन करण्यात सहभाग नोंदविला.

दिनांक २१ जानेवारी रोजी होणाऱ्या एक दिवसीय शाळेत आजी आणि माजी शिक्षक विद्यार्थ्यांची तासिका घेणार असून शाळेची सुरुवात सकाळी ११.३० वाजता प्रार्थना व राष्ट्रगीताने होणार असून मधल्या सुट्टीत माजी



विद्यार्थी घरून आणलेला डब्ब्याचा तसेच शाळेत तयार करण्यात येणाऱ्या खिचडीचा आस्वाद आपल्या बालमित्रांसोबत घेणार आहेत. एकूण ५ तासिका होणार असून विद्यार्थ्यांनी पांढरा शर्ट घालून शाळेत येणार आहेत तसेच अंतिम तासिका खेळाची होणार आहे. या एक दिवसाच्या शाळेमुळे माजी विद्यार्थ्यांना पुन्हा एकदा त्यांच्या बालपणीच्या विश्वात जगण्याची संधी मिळणार असून जुन्या काळातील आठवणीना उजाळा मिळणार आहे त्यामुळे शाळेच्या जास्तीत जास्त माजी विद्यार्थ्यांनी या उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. वर्षा जदबंसी यांनी केले आहे.

# बडनेरा येथे रंगणार प्लास्टिक बॉल क्रिकेट स्पर्धा

## हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे जयंती महोत्सवानिमित्त शिवसेनेचे आयोजन

**दि.१०विदर्भ प्रजासत्ताकअमरावती -** हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांचा जयंती महोत्सव शिवसेना अमरावती जिल्हा शाखेतर्फे साजरा करण्यात येत असून या महोत्सव अंतर्गत बडनेरा येथे रात्रकालीन प्लास्टिक बॉल क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. शिवसेना जिल्हाप्रमुख सुनील खराटे यांच्या पुढाकारातून आयोजित या क्रिकेट स्पर्धेचे उद्धाटन १० जानेवारी रोजी सायंकाळी सात वाजता बडनेरा जुनी वस्ती स्थित चमन नगर ग्राउंड येथे होणार आहे. २० जानेवारी पर्यंत चालणाऱ्या या प्लास्टिक बॉल क्रिकेट स्पर्धेत विदर्भातील तसेच अमरावती जिल्ह्यातील नामवंत संघ व खेळाडू सहभागी होत आहे .बडनेरा येथील नवाब ग्रुप या स्पर्धेचे नियोजन करीत असून कामगार शक्ती सेनेचे विदर्भ अध्यक्ष अक्रम पठाण, मो .शारीक पहेलवान ,शाकीर वेल्डर यांच्या मार्गदर्शनात नवाब भाई ,अजहर भाई ,मो शहाज ,अ. अजहर, निलेश सावळे ,शाहरुख हुसेन ,राजू अक्कलवार, शोएब खान ,कुचीन कैतवास ,मोहम्मद शहाज ,फराहन बेग,आदी परिश्रम घेत आहे .बॉक्स*आकर्षक बक्षिसांची लयलूट*दहा दिवस चालणाऱ्या प्लास्टिक बॉल क्रिकेट स्पर्धेचे विजेतेपद



पटकाविणाऱ्या संघास शिवसेना जिल्हाप्रमुख सुनील खराटे यांच्याकडून २१००० रुपये रोख व मानचिन्ह तसेच उपविजेत्या संघास शोएब भाई कडून रोख ११००० व मानचिन्ह आणि तृतीय क्रमांक पटकाविणाऱ्या संघास राहील मेमन यांच्याकडून सात हजार रुपये रोख व मानचिन्ह देण्यात येणार आहे .सोबतच मॅन ऑफ द सिरीज, मॅन ऑफ द मॅच ,बेस्ट बॉलर, बेस्ट बॅट्समन ,बेस्ट कॅचर यांना प्रत्येकी दोन हजार रुपये रोख आणि मानचिन्ह देण्यात येणार आहे .सोबतच आकर्षक बक्षिसांची लय लुट खेळाडूंवर करण्यात येणार असून या स्पर्धेचा अमरावती व बडनेरा शहरातील क्रिकेट प्रेमींनी आनंद घ्यावा असे आवाहन शिवसेना जिल्हाप्रमुख सुनील खराटे व नवाब ग्रुप यांनी संयुक्तपणे केले आहे.

# पंतप्रधान नरेंद्र मोदींचं कौतुक केल्याने चिदंबरम अडचणीत,

## काँग्रेसने पाठवली नोटिस, १० दिवसांत मागितलं उत्तर

**दि.१०विदर्भ प्रजासत्ताक नवी दिल्ली** - पंतप्रधान नरेंद्र मोदींचं कौतुक करणं काँग्रेसचे नेते कार्ती चिदंबरम यांना चांगलंच महागात पडलं आहे. या कृतीबद्दल काँग्रेस पक्षाकडून त्यांना कारणे दाखवा नोटिस बजावण्यात आली आहे. तसेच या नोटिशीला दहा दिवसांच्या आत उत्तर देण्याचे आदेश त्यांना देण्यात आले आहे. कार्ती चिदंबरम हे काँग्रेसचे दिग्गज नेते पी. चिदंबरम यांचे पुत्र आहेत.

एका मुलाखतीमध्ये कार्ती चिदंबरम यांनी सांगितले होते की, राहुल गांधी यांच्या तुलनेत पंतप्रधान नरेंद्र मोदी हे अधिक लोकप्रिय



आहेत. हेच विधान आता कार्ती चिदंबरम यांच्यासाठी अडचणीचे ठरले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी हे राहुल गांधी यांच्यापेक्षा अधिक लोकप्रिय आहेत असं म्हटल्याने तामिळनाडू प्रदेश काँग्रेसच्या शिस्तपालन समितीचे प्रमुख के. आर. रामसामी यांनी कारणे दाखवा नोटिस बजावली आहे. तसेत त्याला दहा दिवसांच्या आत उत्तर देण्याचे आदेश दिले आहेत.

या मुलाखतीमध्ये कार्ती चिदंबरम यांनी ईव्हीएमबाबतही विश्वास व्यक्त केला होता. हा एक असा मुद्दाआहे ज्यावर काँग्रेसचा निवडणूक आयोगासोबत वाद सुरू आहे. काँग्रेस ईव्हीएमच्या विश्वसनीयतेबाबत शंका उपस्थित करून त्याच्या वापरावर सक्रियपणे विरोध करत आहे. जयराम रमेश यांनी या मुद्द्यावरून निवडणूक आयोगाला पुन्हा पत्र लिहिले आहे.

# अमरावतीचे नऊ जण अयोध्येसाठी सायकलने रवाना

## , प्राणप्रतिष्ठा सोहळ्यात सहभागी होणार एक हजार किमी लांबीची सायकल यात्रा

*दि.१०विदर्भ प्रजासत्ताक अमरावती :- अयोध्या येथे २२ जानेवारी रोजी प्रभू श्रीराम यांच्या मुर्तीची प्राणप्रतिष्ठा होत आहे. या भव्यदिव्य सोहळ्यात सहभागी होण्यासाठी अमरावती येथील नऊ रामभक्त मंगळवारी १० वाजता सायकलने अयोध्येकडे रवाना झाले आहेत. यावेळी कालीमाता मंदिर ट्रस्टचे शक्ती महाराज, माजी राज्यमंत्री जगदिश गुप्ता यांच्या हस्ते झेंडा दाखवून सायकलस्वार रामभक्तांना रवाना करण्यात आले. या सायकलस्वार रामक्तांचे नेतृत्व मेजर राजेंद्र सिंह हे करीत आहे. तर दीपक दुबे, समीर मानेकर, सुरज ठाकूर, दीपक पाली, ऋतिक पाली, राजा चौधरी, शिवकांत बद्रे अण्णा, नरेश अण्णा हे यात*



*सहभागी झाले आहेत. या रामभक्तांनी अयोध्येकडे रवाना होण्यापूर्वी अमरावती शहरातील प्रमुख मार्गाने मार्गक्रमण केले, त्यानंतर नांदगापेव पेठ होत माहुली जहाँगीर पुढे मोर्शी मार्गे मध्यप्रदेशकडे रवाना झालेत.*

# एटीएम फोडून २० लाख ७५ हजार रुपये लंपास

## कॅश ट्रे पळविला, वरूड येथील घटना

**दि.१०विदर्भ प्रजासत्ताक वरूड :** स्थानिक रिंग रोडवर वर्दळीच्या ठिकाणी असलेले एटीएम फोडून चोरट्यांनी कॅश ट्रे पळविला. त्यामधील २० लाख ७५ हजार रुपयांची रक्कम त्यांनी लंपास केली. या दरोडेखोरांनी सीसीटीव्ही कॅमेरेदेखील फोडले. एका निवासस्थानावर लावलेल्या सीसीटीव्हीत एक चोरटा कैद झाला आहे. एका वर्षात तालुक्यातील एटीएम फोडण्याची तिसरी घटना आहे.

पोलिस सूत्रांनुसार, स्थानिक स्टेट बँक ऑफ इंडियाचे रिंग रोडला एटीएम आहे. रात्री सुरक्षा रक्षक नसल्याने बेवारस असते. मंगळवारी पहाटे २ च्या सुमारास वाजताच्या सुमारास अज्ञात चोरट्यांनी एटीएमसह आजूबाजूचे प्रथम सीसीटीव्ही कॅमेरे फोडले. नंतर एटीएम फोडून नोटांच्या ट्रेसह पळ काढला. यामध्ये २० लाख ७५ हजार ८०० रुपयांची रक्कम असल्याचे सांगण्यात आले. याबाबत वरूड पोलिसांना माहिती मिळताच त्यांनी घटनास्थळ गाठले. गॅस कटरने एटीएम मशीनचा पत्रा कापून रकमेवर डल्ला मारल्याची नोंद पोलिसांनी घेतली आहे. हा प्रकार येथील रहिवासी अनिल हेटे यांच्या घरावर लागलेल्या कॅमेऱ्यात कैद झाला.

एपीआय दीपक महाडिक, लक्ष्मण चिंचोलेसह वरूड पोलीस तसेच स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक किरण वानखडे, पोलिस उपनिरीक्षक नितीन चुलपार, रवी बावणे, गजेंद्र ठाकरे, शकील चव्हाण, पंकज फाटे, भूषण पेठे यांच्यासह ठसेतज्ज्ञ प्रशांत तांबुलकर, छायाचित्रकार



राजेश गुहे, फॉरेन्सिक सहायक प्रदीप लहुटकर, अक्षय रेवाडकर आदींनी घटनास्थळ गाठले. श्वान पथक, ठसे तज्ज्ञांनी घटनास्थळ गाठून बारकाईने तपास केला.

### एकजण कॅमेऱ्यात कैद

एटीएम फोडणाऱ्या टोळक्यातील एकाच्या हालचाली हेटे यांच्याकडील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाल्या. तथापि, नेमके किती जणांनी ही चोरी केली, याबाबत अद्याप काहीही सांगता येणार नसल्याचे प्रभारी ठाणेदार सतीश इंगळे यांनी स्पष्ट केले.



पाहिजेत

विदर्भ प्रजासत्ताक
सांध्य मराठी दैनिक

अल्पावधीतच हजारो वाचकांच्या पसंतीस पडलेल्या सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक साठी जिल्ह्यातील प्रत्येक तालुका,गाव तसेच वॉर्डनिहाय पत्रकारांची गरज आहे.लिखाणाची आवड तसेच उत्कृष्ट जनसंपर्क असणाऱ्या व्यक्तींनीच आमच्या मेल आय डी वर आजच संपर्क करा

संपर्क- prajasattaknews24gmail.com

# अमरावती येथे २० जानेवारीला राज्यस्तरीय देशमुख मराठा वधू-वर परिचय मेळावा व स्नेहसंमेलन

**दि.१० विदर्भ प्रजासत्ताक दर्यापूर**

डॉ भाऊसाहेब उपाख्य पंजाबराव देशमुख बहुउद्देशीय संस्था अमरावती व दि स्वामीनी महिला युनिटी अमरावती आणि देशमुख परिवार अमरावती यांच्या वतीने अमरावती येथील हॉटेल रांगोळी पर्ल, नवाथे चौक,बडनेरा रोड अमरावती येथे दिनांक २० जानेवारी २०२४ रोजी सकाळी १० वाजता राज्यस्तरीय देशमुख मराठा वधू-वर परिचय मेळावा व स्नेहसंमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. या मेळाव्याला उद्घाटक म्हणून श्री.प्रभाकरराव देशमुख(नागपूर) तर अध्यक्ष म्हणून श्री सूर्यकांतजी काकडे(पुणे) उपस्थित राहणार आहेत.यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून श्री. बाळासाहेब देशमुख घाटनांदूर ता. अंबेजोगाई जि.बीड,श्री. गजाननराव देशमुख बोईसर, जि. पालघर,डॉ.तूषार देशमुख कुलसचिव, संत गाडगेबाबा



अमरावती विद्यापीठ, अजितदादा चव्हाण माजी संवाददाता, नएए २४ तास, ठाणे प्रदेश प्रवक्ता, भाजपा, महाराष्ट्र,नरेंद्रदादा प्रतापराव देशमुख सिनेअभिनेता (सरसमकर, जि. नांदेड),प्रा. दिपकराव देशमुख (कुरूमकर) अमरावती,श्री. जी.आर. देशमुख अव्वर सचिव,अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण,महा.राज्य,डॉ.सौ.प्रितीताई देशमुख कृषि शास्त्रज्ञ, वसंतदादा शुगर इन्स्टिट्युट, प्राचार्य डॉ. वर्षाताई देशमुख अध्यक्षा, दि स्वामिनी महिला युनिटी,अमरावती आदी उपस्थित राहणार आहेत.

तरी या कार्यक्रमाचा देशमुख समाज यांनी लाभ घ्यावा असे आवाहन श्री.नितीन राघवेन्द्र देशमुख अध्यक्ष डॉ.भाऊसाहेब उपाख्य पंजाबराव देशमुख बहुउद्देशीय संस्था,अमरावती व दि.स्वामिनी महिला युनिटी, अमरावती यांची संपूर्ण कार्यकरणी आणि समस्त देशमुख परिवार, अमरावती यांनी केले आहे.अधिक माहिती करीता संपर्क मो.७७७५८७६५७५ मो.८६००९९२८७२, मो.९४०३१७७१२९, मो.९४२२२६४४९८ ,मो.९४२२९१५४८१, मो. ९९७००७८५४९, मो. ९८७०४५५११५ यावर संपर्क करावा अशी माहिती आयोजकांनी दिली आहे.

# चांदूरबाजार शहरातील खाजगी रुग्णालय २४ तास उघडे ठेवा

## उपजिल्हा रुग्णालयाची इमारत बनली पांढरा हत्ती : प्रहार अल्पसंख्याक सेलचे सीएसला निवेदन

**दि.१० विदर्भ प्रजासत्ताक चांदुर बाजार**

चांदूरबाजार शहरातील खाजगी रुग्णालये आता रुग्णसेवेची ठिकाणे न राहता व्यवसाय झाला असल्याने येथे रात्रीची रुग्णतपासणी व उपचार दुरापास्त झाले आहेत.यात काही खाजगी रुग्णालयातील डॉक्टर शहरात मुक्कामी राहत असल्याने ते याला अपवाद ठरतात.मात्र बहुतेक खाजगी तज्ञ डॉक्टर येथे दिवसभर राहतात सायंकाळी अमरावतीला निघून जात असल्याने मेजर रुग्णांना रात्रीची रुग्णसेवा मिळत नाही.यामुळेच येथील दोघा हृदयविकाराच्या रुग्णांना अमरावतीच्या वाटेतच आपला जिव गमवावा लागला.तर ग्रामीण रुग्णालयात रात्री-अपरात्री रुग्णांना सुविधा दिल्या जातात मात्र तेथे आवश्यक मनुष्यबळ व आवश्यक सुविधा नाही हे वास्तव आहे.उपजिल्हा रुग्णालयाची टोलेजंग इमारत उभी होऊन दोन-तीन वर्ष लोटले मात्र तेथे आवश्यक मनुष्यबळ व यंत्रसामुग्री नसल्याने ही इमारत पांढरा हत्ती



बनली आहे.याची दखल घेऊन प्रहार जनशक्ती पक्षाच्या अल्पसंख्यांक आघाडीचे शहराध्यक्ष शे.फारुक शे.कादर यांनी चांदूरबाजार शहरातील खाजगी रुग्णालये एक दिवस आड २४ तास उघडे ठेवण्याचे आदेश देण्याची मागणी राज्याचे आरोग्य मंत्री,आ.बच्चु कडु ,विभागीय आयुक्त,जिल्हाधिकारी,जिल्हा शल्य चिकित्सक यांना निवेदन देऊन केली आहे. चांदूर बाजार तालुक्यातील ग्रामीण भागात आदीवाशी बहुल क्षेत्रासह १७० चे वर लहान मोठी गावे आहेत. तसेच चांदूरबाजार शहरा मध्ये ग्रामीण रूग्णालय आहे मात्र तेथे हि कधी डॉक्टर उपब्ध नसतात,तर कधी औषध साठा उपलब्ध नसतो.रुग्णालयात रुग्णावर उपचार करण्यासाठी यंत्रणा व आवश्यक साहित्य नाही .तोकड्या कर्मचार्यांवरील ग्रामीण रुग्णालयाचा कारभार प्रभारीवरच आहे. त्यामुळे ग्रामीण रुग्णालयात आलेल्या रुग्णावर उपचार होत नाही. रेफर टू अमरावती अशी अवस्था आहे.रुग्णाला अमरावती पोहचे पर्यंत आपला जिव गमवावा लागतो.रात्री अपरात्री रात्री रुग्णाची तबेत बिघडली तर ग्रामीण रुग्णालयातुन अधिकतर रुग्ण रेफरच केले जातात . त्यामुळे आता पर्यंत अनेक रुग्णाला अमरावतीच्या वाटेतच आपला जिव गमवावा लागला.

चांदूर बाजार शहरात लहान, मोठी खाजगी दवाखाने भरपुर आहेत.मात्र त्यांची दवाखाने दिवसापुरती मर्यादित आहे.शनिवारी तर बहुतेक खाजगी दवाखाने बंदच राहतात. येथील खाजगी दवाखान्यातील डॉक्टर जिल्हयाची ठिकाणी निवासाला राहतात.त्यामुळे सायंकाळी सहा नंतर ते चांदूरबाजारातील दवाखान्यातून निघून जातात.ग्रामीण भागातील व शहरातील नागरीकांना व रुग्णाला वेळेवर वैद्यकीय सुविधा मिळत नाही.त्याला उपच्चारा करीता जिल्हाच्या ठिकाणावर उपचारासाठी जाण्या शिवाय दुसरा पर्याय नसतो.ग्रामीण रुग्णालयात रेफरची परंपरा आजही कायम आहे. अमरावती रुग्ण पोहचे पर्यंत त्याला आपला जिव गमवावा लागतो.खाजगी डॉक्टर रात्री उपलब्ध नसल्याने चांदूरबाजारातील दोघा हृदरवाकाराच्या रुग्णांना अमरावतीच्या वाटेतच आपला जीव गमवावा लागला.असे भयानक वास्तव असुन चांदूर बाजार शहरातील खाजगी दवाख्यात पुर्ण वेळ डॉक्टर उपलब्ध राहण्यासोबतच एक दिवसा आड २४ तास दवाखाना सुरु ठेवण्याचे आदेश शहरातील खाजगी दवाखान्यांला देण्यात यावे.२४ तास दवाखाने व डॉक्टर उपलब्ध झाले तर आपण रुग्णांचे जिव वाचवू शकतो.तरी शहरातील खाजगी दवाखाने एक दिवसा आड २४ तास उघडी ठेवण्याचा आदेश देण्यात यावे असे निवेदन प्रहार अल्पसंख्यांक आघाडीचे शहराध्यक्ष शे.फारुख शे. कादर यांनी आरोग्य मंत्री,आ.बच्चु कडु ,विभागीय आयुक्त,जिल्हाधिकारी व जिल्हाशल्य चिकीत्सकांना निवेदन देऊन केली आहे.

# राज्यात ओबीसी आरक्षणाची टक्केवारी २७ वरून ३८ करण्यात यावी हरिभाऊ राठोड यांची मुख्यमंत्र्याकडे मागणी

**दि.१०विदर्भ प्रजासत्ताक यवतमाळ** : राज्यांमध्ये बांठीया आयोगाच्या माध्यमातून इम्पीरीकल डाटा प्राप्त झाला आहे. बांठीया आयोगाच्या अहवालानुसार ३७.७० टक्के ओबीसी असल्याचे म्हटले आहे. यापूर्वी सर्वोच्च न्यायालयाच्या रीट पिटीशन २५९/९४ यामध्ये दिलेल्या निर्णयानुसार(२०१०) जर एखाद्या राज्याने ओबीसीचा इम्पीरीकल डाटा गोळा केला असेल तर एकूण ओबीसीची टक्केवारी ५० टक्के च्या वर जाऊ शकते असा निवाडा दिलेला आहे. याच निवाड्यानुसार तामीळनाडूचे आरक्षण वाढविण्यात आले होते.

आता राज्यात सुद्धा ओबीसीला २७% ऐवजी ३८% आरक्षण देता येईल व त्यामुळे एकूण आरक्षण राज्यात ५८% होईल असे ओबीसी नेते , आरक्षणाचे अभ्यासक हरिभाऊ राठोड यांनी मुख्यमंत्र्यांना लिहिलेल्या पत्रात म्हटले आहे.

राज्यात सध्या आरक्षणावरून मराठा आणि ओबीसीमध्ये संघर्ष सुरू झालेला आहे. यात मराठा



आरक्षणाचा प्रश्न जटिल झालेला आहे. या परिस्थितीत हे वाढीव आरक्षण मिळाल्यामुळे राज्यातला हा जटिल प्रश्न सोडविणे सोपे झाले आहे असे राठोडाचे म्हणणे आहे. राज्यातील ओबीसी आरक्षणाची फेररचना करून ओबीसी उपवर्गीकरण केल्यानंतर भटके, विमुक्त, धनगर , बंजारा , वंजारी , बारा बलुतेदार , एसबीसी , माळी , तेली , आगरी , भंडारी , मराठा कुणबी, लेवा पाटील , पाटीदार आणि राजपूत या सर्व समाजाचे समाधान होईल असा फार्मूला हरिभाऊ राठोड यांनी तयार केला आहे.

### पुढील प्रमाणे आरक्षण देता येईल

भटके तीन टक्के , विमुक्त चार टक्के , धनगर चार टक्के , वंजारी तीन टक्के , एस बी सी दोन टक्के, बारा बलुतेदार तीन टक्के , माळी तेली आगरी भंडारी चार टक्के , इतर ओबीसी पाच टक्के , कुणबी मराठा, मराठा कुणबी ,राजपूत यांना दहा टक्के आरक्षण देता येईल. याप्रमाणे आरक्षण दिल्यास मराठा आरक्षणाचा जटिल प्रश्न सोडवता येईल असे आरक्षणाचे अभ्यासक राठोड यांनी सांगितले.

या फार्मूल्यानुसारच मराठा समाजाला आरक्षण देता येईल जेणेकरून ओबीसीच्या मूळ २७% आरक्षणाला धक्का लागणार नाही आणि मराठा समाजाला सुद्धा योग्य प्रमाणात आरक्षण देता येईल आणि खऱ्या अर्थाने सर्व समाज घटकांना सामाजिक न्याय देता येईल असेही राठोड यांचे म्हणणे आहे.

मराठा आणि ओबीसी एकमेकांसमोर भारत पाकिस्तान सारखी लढाई लढत असल्याचे दिसून येते, ही लढाई बंद करावी आणि ओबीसी नेत्यांनी हरिभाऊ राठोड फार्मूलाचा साकल्याने अभ्यास करावा असे आवाहन बिगर राजकीय पक्षाच्या विचारवंताना राठोड यांनी दिला आहे

# प्रतिभा साहित्य संघ,सांस्कृतिक विभागाची दर्यापूर तालुका कार्यकारिणी जाहीर



**दि.१०विदर्भ प्रजासत्ताक दर्यापूर**

प्रतिभा साहित्य संघ,महाराष्ट्र राज्य या साहित्य चळवळीच्या,सांस्कृतिक विभाग, दर्यापूर तालुकाध्यक्ष पदी श्री.शिवाजी शिक्षण संस्था द्वारा संचालित रत्नाबाई राठी हायस्कूल मधील शिक्षक प्रतिनिधी विलासराव मुळे यांची निवड करण्यात आली असून कार्यकारिणीत सौ. निलिमा महल्ले-वडतकर,राहुल महाजन,सुधीर पिसे,सौ.अश्विनी बुरघाटे,पर्यवेक्षक हेमंत रेचे इत्यादींचा समावेश करण्यात आला असल्याची माहिती प्रतिभा साहित्य संघाचे जिल्हाध्यक्ष राजेन्द्र ठाकरे यांनी दिली आहे.शिक्षण महर्षी डॉ.पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या शतकोत्तर रौप्य महोत्सवी जयंत्युत्सव व स्नेहसंमेलनातील सोहळ्यात शाळेच्या वतिने शैक्षणिक व शेतकरी काव्य परिषदेचे आयोजन करण्यात आले होते.या परिषदेच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे आजीवन सदस्य तथा जेष्ठ कवी प्रल्हादराव मुळे होते.तर ॲड.मधुकरराव टाले यांची प्रमुख उपस्थिती होती.काव्य परिषदेत प्रतिभा साहित्य संघाचे संस्थापक अध्यक्ष,कवी विठ्ठल कुलट,विजय सोसे,गजानन मते,प्रशांत कोल्हे, गोपाल मापारी,प्रल्हादराव मुळे,प्रवीण कावरे यांनी बहारदार कविता सादर करून संमेलनात रंगत आणली.यावेळी मुख्याध्यापक हेमंत शेंडे,किशोरराव खडसे,अरूण काकड,शफाकत अली देशमुख तसेच शिक्षक,शिक्षिका व इतर कर्मचारी वृंद यांची उपस्थिती होती.शाळेतील विद्यार्थ्यांनी काव्य परिषदेला उत्स्फूर्तपणे प्रतिसाद दिला.समारोपीय कार्यक्रमात विलासराव मुळे यांचा शाल,श्रीफळ व वृक्ष रोपटे देऊन गौरव करण्यात आला.या निवडीचे गजाननराव देशमुख,विनोदराव शिंगणे,गजाननराव सोनवणे,तुळशीदास धांडे ,राजाभाऊ ढोले,प्रा.गजाननराव भारसाकळे व प्रतिभा साहित्य संघाच्या दर्यापूर तालुका समस्त पदाधिकाऱ्यांनी स्वागत केले आहे.

# 'पणन'च्या निवडणुकीत काँग्रेसची सरशी

**दि.१० विदर्भ प्रजासत्ताक यवतमाळ**

महाराष्ट्र कापूस उत्पादक पणन महासंघाच्या चार जागांसाठी सात जानेवारीला मतदान झाले. चारही जागांसाठी आज मंगळवारी (ता. नऊ) मतमोजणी झाली. चारपैकी दोन जागा राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) पक्षाने, तर दोन जागांवर काँग्रेसचे उमेदवार विजयीझाले. १७ संचालकांपैकी काँग्रेसकडे आठ, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) व राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) चे प्रत्येकी चार उमेदवार विजयी झाले आहेत.राज्य कापूस उत्पादक पणन महासंघासाठी सात जानेवारीला चार जागांसाठी मतदान झाले. चारही जागांची मतमोजणी मंगळवारी (ता. नऊ) झाली. त्यात नागपूर विभागातून माजी आमदार सुरेश देशमुख विजयी झाले. त्यांना १४ मते

### राष्ट्रवादी फिफ्टी फिफ्टी चार जागांचे निकाल जाहीर

मिळाली. त्यांच्या विरोधात असलेले माजी मंत्री रमेश बंग यांना १२ मते मिळाली. वणी विभागातून संजय खाडे सात मते घेऊन विजयी झाले. त्यांनी धोटे यांचा चार मतांनी पराभव केला. नांदेड विभागात राजेंद्र केशवे यांना ११ मते मिळाली. त्यांनी मोहन पाटील यांचा दहा मतांनी पराभव केला.

सर्वांचे लक्ष लागून असलेल्या ओबीसी या राखीव प्रवर्गातून माजी संचालक प्रसन्नजित पाटील यांचा विजय झाला. त्यांना १०९ मते मिळाली. या गटात पाटील यांच्या विरोधात असलेले चंद्रकांत बाविस्कर यांना ७५ मते मिळाली. यापूर्वी १३ संचालक बिनविरोध निवडून आले आहेत. १७ पैकी आठ जागा काँग्रेसकडे आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) कडे चार तर राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) कडे चार जागा आहेत. एका जागेवर भाजपचा उमेदवार विजयी झाला आहे.

**अध्यक्षपदाची माळ कुणाच्या गळ्यात**

पणन महासंघावर काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेसचे वर्चस्व राहिले आहे. यावेळीही १६ जागा काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेसकडेच आहेत. मात्र, उपमुख्यमंत्री अजित पवार महायुतीत सहभागी झाल्याने पाच जागा महायुतीकडे गेल्या आहेत. काँग्रेस व राष्ट्रवादी (शरद पवार गट) कडे २२ जागा आहेत. पणन महासंघाचे अध्यक्षपद काँग्रेसकडेच जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे कुणाला संधी मिळणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# सुनील केदार यांच्या शिक्षेला स्थगिती, जामीनही मंजूर

**दि.१०विदर्भ प्रजासत्ताक नागपूर**

माजी मंत्री सुनील केदार यांच्या शिक्षेला स्थगिती देत नागपूर उच्च न्यायालयाने जामीन मंजूर केला. नागपूर जिल्हा मध्यवर्ती सहकार बँक



प्रकरणात ट्रायल कोर्टने केदार यांना पाच वर्षांची शिक्षा सुनावली होती. सुनील केदार यांनी यानंतर सत्र न्यायालयात जामिनासाठी अर्ज केला, मात्र तिथे त्यांच्या पदरी निराशा आली.

सर्व बाबींचा विचार करून सुनील केदार यांना जामीन मंजूर केला जात आहे, असा आदेश न्यायमूर्ती उर्मिला जोशी फाळके यांच्या खंडपीठाने दिला. सुनील केदार यांना एक लाख रुपये मोबदल्यात जामीन मंजूर केला आहे. सुनील केदार यांना प्रत्येक महिन्याच्या एक तारखेला न्यायालयात हजर व्हायचे आहे. नागपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेतील १५० कोटी रुपयांच्या सरकारी रोखे खरेदी घोटाळा प्रकरणात राज्याचे माजी मंत्री सुनील केदार यांच्यासह सहा आरोपींना कमाल पाच वर्षे सश्रम कारावासाची शिक्षा सुनावण्यात आली. तसेच प्रत्येकी एकूण १२ लाख ५० हजार रुपये दंड ठोठावण्यात आला होता.

# पत्रक अंतिम होईना कर विभागावर पडतोय कामाचा ताण

### महापालिकेचा मालमत्ता कर प्रकरण

**दि.१०विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

महापालिकेने मालमत्ता करामध्ये वाढ केली असून त्याच्या माहीतीचे पत्र चार झोनमधील नागिरकांना पाठविण्यात आले आहेत. एका झोनमधील नोटीसेस वितरणाची प्रक्रिया सुरू असून अद्याप डिमांड नोट न पाठविल्याने नेमका किती कर लागला व भरावा लागणार आहे हे स्पष्ट झालेले नाही. त्यासाठी फेब्रुवारी महिना उजाडण्याची शक्यता असल्याचे मनपाच्या कर विभागातून सांगण्यात आले.

वर्ष २००५-०६ नंतर गेल्या



वर्षी महापालिका क्षेत्रातील मालमत्तांचे सर्वेक्षण करण्यात आले. त्यामध्ये वाढीव मालमत्ता व खुले भूखंड असे तीन लाखाच्या जवळपास मालमत्ता आढळल्या आहेत. या सर्व मालमत्तांना सुधारीत दराने कर आकारणी करण्यात आली आहे. त्यामुळे मनपाच्या तिजोरीत दीडशे कोटी रूपयांच्या आसपास महसूल गोळा होईलकर मुल्यांकनाची माहिती देण्याकरिता कर विभागाने चार झोनमधील नागरिकांना सूचना पत्र पाठविले आहे. त्यावर आक्षेप मागवून सुनावणीचाही कार्यक्रम घेण्यात येत आहे. झोन क्र २ मधील सूचना पत्रक आता वितरीत होत असून त्यावरही आक्षेपांची सुनावणी होणार आहे. अद्याप चार झोनमधील मालमत्ता धारकांना कर भरण्यासंदर्भात डिमांड नोट पाठविण्यात आलेल्या नाहीत. त्यावर काम सुरू असल्याचे कर विभागाने म्हटले असून फेब्रुवारी महिन्यात त्या अंतिम होण्याची शक्यता असल्याचे सांगण्यात आले. नागरिकांना कर कमी होण्याची प्रतिक्षा आहे. त्यासाठी मनपा प्रशासनाविरोधात काँग्रेससह विविध राजकीय पक्षांचे आंदोलने सुरूच आहेत. कर आकारणी किती झाली हे कळले असले तरी अंतिम नोटीस न आल्याने नागरिक आता त्याची प्रतिक्षा करू लागले आहे.

# सत्ताधारी निवडणार पाच संचालकशिक्षक बँकेत इच्छुकांची फिल्डिंग : बहुमताचा फायदा

**दि.१०विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

जिल्हापरिषद शिक्षक सहकारी बँकेतील पाच विरोधी संचालकांवर अविश्वासाचा प्रस्ताव पारित करण्यात आल्यानंतर रिक्त जागेवर आपली वर्णी लावण्यासाठी इच्छुकांकडून फिल्डिंग लावण्यात येत आहे. बहुमताच्या आधारावर सत्ताधारी गट रिक्त जागांसाठी पोटनिवडणूक लावू शकते किंवा स्वीकृत संचालक म्हणून सुद्धा नियुक्ती करू शकतात. येत्या काही दिवसांत तशी प्रक्रिया सुद्धा सुरु केली जाणार आहे.

> पोटनिवडणूक घ्यायची की संचालक नियुक्त करायचे हा अधिकार सर्वस्वी बँकेला आहे. रिक्त जागा भरण्याची प्रक्रिया बँकेकडून अहवाल आल्यानंतरच घेतली जावू शकते.
>
> **विनायक कहाळेकर,**
> **विभागीय सहनिबंधक,**
> **सहकार विभाग**

जिल्हापरिषद शिक्षक सहकारी बँकेत सत्ताधारी व




विरोधी सदस्यांमध्ये सुरू असलेल्या सत्तासंघर्षाचा शेवट पाच संचालकांवर अविश्वास प्रस्ताव पारित करून झाला. प्रभाकर झोड,संजय नागे, मंगेश खेरडे, गौरव काळे व मनोज चौरपगार या पाच संचालकांवर अविश्वासाचा ठराव पारित करण्यात आल्यानंतर रिक्त झालेल्या जागेसाठी पोटनिवडणूकीचे वारे वाहू लागले आहे. बँकेत गोकुलदास राऊत यांच्या अध्यक्षतेखालील सत्ताधारी गटाचे १६ संचालक असून बहुमाताचा आकडा त्यांच्याकडेच आहे. त्यामुळे रिक्त जागेवर संचालकाची नियुक्ती सुद्धा ते करू शकतात. तर पोटनिवडणूकीचा मार्ग सुद्धा मोकळा आहे, मात्र पोटनिवडणूक लागल्यास पुन्हा खर्च होवू शकतो, ही शक्यता गृहित धरून संचालकांकडून नवीन संचालक नियुक्त करण्याचाच पर्याय सत्ताधारी निवडणार असल्याची चर्चा आहे.

# ७ हजार किलोचा 'राम हलवा' बनणार; लाखो रामभक्तांना देणार प्रसाद, भक्तांना उत्सुकता

**दि.१०विदर्भ प्रजासत्ताक नागपूर**

प्रसादाचा शिरा म्हणजे तो मऊ, लुसलुशीत अन् तितकाच गोड. रामलल्लाच्या अयोध्येतील प्रतिष्ठापना सोहळ्यासाठी नागपुरातील प्रसिद्ध शेफ विष्णू मनोहर ७००० किलोचा 'राम हलवा' तयार करणार आहेत. यासाठी विष्णू मनोहर यांनी १२ हजार लीटर क्षमतेची खास कढई बनवली असून, त्यात ते राममंदिर परिसरात होणाऱ्या या कार्यक्रमासाठी 'राम हलवा' तयार करणार आहेत.

## १२ हजार लिटरची बनवली कढई



या कढईत ७,००० किलो हलवा बनवता येतो. तो उचलण्यासाठी क्रेनची आवश्यकता असते. रामलल्लाला अर्पण केल्यानंतर हा प्रसाद सुमारे दीड लाख रामभक्तांना वितरित करण्यात येणार आहे.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासही इतर अनेक मान्यवरांची उपस्थिती राहणार आहे. त्यामुळे नागपूरकर विष्णूजींच्या हलव्याची लज्जत प्रसादाच्या रुपातून देशाच्या कोनाकोपऱ्यातून आलेल्या रामभक्तांना मिळणार आहे.

# भाजपा नेते आशीष देशमुख यांच्या घरासमोर केदार समर्थकांनी फटाके फोडले

**दि.११विदर्भ प्रजासत्ताक नागपूर :** बँक घोटाळ्यात शिक्षा झाल्यामुळे आमदारकी रद्द झालेले काँग्रेसचे नेते सुनील केदार यांची बुधवारी जामिनावर सुटका झाली. त्यांच्या समर्थकांनी भाजपा नेते आशीष देशमुख यांच्या घरासमोर फटाके फोडून केदार यांच्या सुटकेचा जल्लोष साजरा केला.

केदार यांच्या शिक्षेला स्थगिती देत मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने मंगळवारी जामीन मंजूर केला.



केदार यांची आज दुपारी सुटका होणार असल्याने कार्यकर्ते आपल्या नेत्याचे कारागृहाबाहेर स्वागत करण्यासाठी मोठया संख्येने सकाळपासून नागपूर मध्यवर्ती कारागृहासमोर गोळा झाले होते. सुनील केदार करागृहाबाहेर आले. त्यांच्या समर्थकानी घोषणा देत नागपूर मध्यवर्ती कारागृहापासून मिरवणूक काढली. त्यामुळे अजनी चौक ते राहाटे कॉलनी चौक वाहतूक बंद करण्यात आली होती. दरम्यान केदार यांचे राजकीय विरोधक व भाजपा नेते आशीष देशमुख यांच्या सिव्हिल लाईन्समधील घरासमोर केदार समर्थकांनी सुनील केदार जिंदाबादच्या घोषणा देऊन फटाके फोडले.

# फेलोशीपच्या परीक्षेत प्रश्नपत्रिकांच्या झेरॉक्स, तिसऱ्यांदा पेपरफुटी; बार्टी, सारथी, महाज्योतिचा भोंगळ कारभार

**दि.१०विदर्भ प्रजासत्ताक नागपूर :**

बार्टी, महाज्योती व सारथीच्या अधिछात्रवृत्तीसाठी झालेल्या संयुक्त परीक्षेदरम्यान विद्यार्थ्यांना चक्क झेरॉक्स काढलेल्या व सील नसलेल्या प्रश्नपत्रिका देण्यात आल्या. नागपूरसह पुणे, औरंगाबाद, कोल्हापूर या चारही केंद्रावर हा पेपरफुटीचा गैरप्रकार झाल्याने विद्यार्थ्यांमध्ये प्रचंड असंतोष पसरला. नागपुरात बुधवारी परीक्षा केंद्राबाहेर परीक्षार्थिंनी तीव्र असंतोष व्यक्त करीत परीक्षेवरच बहिष्कार घातला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) सह महाज्योती व सारथी या संस्थांद्वारे पीएचडी करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या फेलोशीप पात्रतेसाठी बुधवारी संयुक्तपणे परीक्षा घेण्यात आली. नागपूरला कमला नेहरू महाविद्यालयात परीक्षेचे केंद्र होते व सकाळी १० वाजताच्या परीक्षेसाठी वेगवेगळ्या जिल्ह्यातून शेकडो विद्यार्थी कालपासून नागपुरात दाखल झाले होते. सकाळी पेपर सुरू झाल्यावर काही खोल्यांमध्ये प्रश्नपत्रिकांचा तुटवडा पडला. बऱ्याच परीक्षार्थिंना प्रश्नपत्रिकांच्या झेरॉक्स देण्यात आल्या.



## दुसऱ्यांदा परीक्षेत गोंधळ

बार्टी, सारथी आणि महाज्योतीने या फेलोशिपसाठी २४ डिसेंबर २०२३ रोजी राज्यभर चाळणी परीक्षा घेतली होती. मात्र, २०१९ च्या परीक्षेसाठी तयार करण्यात आलेली प्रश्नपत्रिका पुन्हा २०२३ च्या परीक्षेत विद्यार्थ्यांना देण्यात आली. विशेष म्हणजे २०१९ मध्ये सेटसाठी जी परीक्षा घेण्यात आली होती, तोच पेपर २०२३ च्या या फेलोशिपच्या परीक्षेसाठी वापरण्यात आला होता. त्यामुळे हा पेपरही रद्द करण्यात आला. आता पुन्हा परीक्षार्थिंना परीक्षेचा ससेमिरा सहन करावा लागला व त्यातही गोंधळ निर्माण झाला.

या प्रश्नपत्रिकांना सीलसुद्धा लागले नव्हते व साधे स्टॅपल मारून जोडले होते. हा प्रकार पाहुन परीक्षार्थींमध्ये असंतोष पसरला व सर्वच्या सर्व पेपर घेत वर्गाबाहेर पडले व सरकारविरोधात तीव्र घोषणाबाजी करीत ठिय्या मांडला.

विद्यार्थ्यांचा असंतोष लक्षात येताच डीसीपींच्या नेतृत्वात पोलिसांचा ताफा तेथे पोहचला. मात्र परीक्षार्थींचा रोष काही शमला नाही. दरम्यान शिक्षक आमदार ॲड. अभिजित वंजारी यांनी तेथे पोहचून विद्यार्थ्यांशी चर्चा केली. त्यांनी महाज्योतिचे संचालक राजेश खवले तसेच सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. गोसावी यांच्याशीही चर्चा केली. परीक्षार्थिंनी जवळपास साडेतीन तास केंद्रावरच ठिय्या मांडला व त्यानंतर नागपुरातील महाज्योतीच्या कार्यालयावर मोर्चा काढला.

## चाळणी परीक्षेचे थोतांड कशासाठी?

प्रचलित पद्धतीनुसार विद्यापीठांच्या प्रवेश परीक्षेद्वारे पीएच.डी.साठीचे प्रवेश दिले जातात किंवा पीजीनंतर नेट-सेट परीक्षेत उत्तीर्ण झाल्यानंतर मुलाखत देऊन, पीएच. डी.ला प्रवेश मिळवता येतो. नव्या शैक्षणिक धोरणानुसार चार वर्षांचा पदवी अभ्यासक्रम किमान ७५ टक्के गुणांसह किंवा पदवीनंतर एक वर्षाचा पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम पूर्ण केल्यावर पीएच. डी.ला प्रवेश घेता येतो, असा नियम २०२२ मध्ये युजीसीने केला आहे.

# मकरसंक्रातीत रंगणार पतंगबाजी मुलांमध्ये बघायला मिळतोय उत्साह

## नायलॉन मांजापासून रहा सावधान : धोका होण्याची शक्यता, मुलांना सांभाळा

**दि.१०विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

नववर्षातील महत्त्वाचा सण म्हणजे मकरसंक्रांत. यानिमित्ताने बच्चे कंपनींकडून पतंगबाजीला उधाण येते. अमरावती शहरातील विविध व्यावसायिकांनी शहरात रंगीबेरंगी पतंगांची दुकाने सजवली आहे. बच्चे कंपनीसह मोठेही पतंग खरेदी करीत आहेत. विशेषतः सुटीच्या दिवशी चिमुकल्यांकडून खरेदी केली जात आहे. मात्र नायलॉन मांजापासून सावध राहणे गरजेचे आहे.

शहरातील विविध भागामध्ये रेडिमेड पतंग दुकानात दाखल झाल्या आहेत. पतंगबाजीचा खेळ रंगणार आहे. सध्या अनेक मुले पतंग उडविताना दिसत आहेत.



### पतंगाच्या किमती वाढल्या

शहरात विविध डिझाईनच्या, विविध रंगाच्या पतंग विक्रीसाठी दुकानांमध्ये उपलब्ध आहेत. दहा रुपयांपासून शंभर रुपयांपर्यंत एका पतंगाची किमत आहे. विविध आकाराच्या कागदी तसेच प्लास्टिकच्या पतंग दुकानात लटकलेल्या दिसत आहेत. या दोन्ही पतंगांना मुलांची पसंती दिसून येत आहे. ५० रुपयांपासून १०० तसेच १५० ते २०० रुपयांपर्यंत मांजाच्या किमती आहेत. ग्रामीण भागापेक्षा शहरी भागात पतंगबाजीचा उत्साह अधिक असतो. शहरी भागातील मुले नवीन वर्षाच्या सुरुवातीपासूनच पतंग उडविताना दिसून येत आहेत. दरम्यान अनेक मुलांच्या पतंग झाडाला व ताराला अडकल्याचे दिसून येत आहेत.

**पालकांनो साधवान, रस्त्याने धावतात मुले**

गेल्या काही दिवसांपासून शहरात पतंगबाजीला उधाण आले आहे. मुले सकाळपासूनच पतंग उडविताना दिसून येत आहेत. विशेष म्हणजे, पतंग एक मात्र त्या पतंगामागे पाच-सात मुले रस्त्यावरून धावताना दिसत आहे. त्यामुळे पालकांनी वेळीच लक्ष देऊन आपल्या मुलांकडे अधिक लक्ष देणे महत्त्वाचे आहे.

# वीजग्राहकांनी सावधगिरी बाळगावी: महावितरणचे आवाहन

## महावितरण ॲपसोबत इतर ॲप डाऊनलोड करणे पडू शकते महागात

**दि.१०विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

महावितरणच्या नावाने बनावट संदेश पाठवून नागरिकांच्या बँक खात्यावर ऑनलाइन डल्ला मारण्याचे प्रकार घडत असताना आता चक्क महावितरणच्या ॲपसोबत दुसरे ॲप डाऊनलोड करण्यास सांगून त्या माध्यमातून बँक खाते साफ करण्याचा नवा फंडा सायबर चोरट्यांनी अवलंबिला आहे. महावितरण कधीही फोन करून अशा प्रकारचे थर्ड पार्टी ॲप डाऊनलोड करायला सांगत नाही. त्यामुळे वीजग्राहकांनी सावधगिरी बाळगावी, असे आवाहन महावितरणकडून करण्यात आले आहे.



या ग्राहकास सायबर भामट्यांनी आधी वीजपुरवठा खंडित करण्यात येणार असल्याचा संदेश पाठवून सायबर चोरट्यांनी शहरातील एका ग्राहकाच्या खात्यातून मोठी रक्कम उडविल्याची घटना घडली आहे. महावितरणचा व नंतर दुसरा ॲप डाऊनलोड करण्यास सांगितले होते.या दुसऱ्या ॲपच्या माध्यमातून संबंधित सायबर ग्राहकाच्या मोबाइलचा ताबा घेऊन सायबर र चोरट्यांनी त्यांच्या बँक खात्यावर वर डल्ला मारला होता. या पृष्ठभूमीवर या महावितरणकडून जनजागृतीवर भर देण्यात येत आहे. महावितरणकडून ग्राहकांना जो एसएमएस पाठविला जातो, त्यामध्ये मेसेज पाठविणाऱ्याच्या नावात स्पष्टपणे MSEDCL असा कंपनीचा उल्लेख असतो.

महावितरणच्या ऑनलाइन सेवेचालाभ घेताना फक्त महावितरणचेच ॲप डाऊनलोड करावे, सोबत दुसरे कोणतेही थर्ड पार्टी ॲप डाऊनलोड करू नये, असे आवाहन महावितरणने केले आहे. हेल्पलाइन क्रमांक इंटरनेटवर शोधल्यासही फसवणूक होण्याची शक्यता असते.

### सायबर भामटे अशी करतात फसवणूक

सायबर मटे सर्वप्रथम संदेश पाठवून वैयक्तिक नंबरवर संपर्क साधण्यास सांगतात. ग्राहकाने संपर्क साधला तर त्याला त्याच्या कॉम्प्युटर किंवा मोबाइलचा ताबा घेता येईल, असे थर्ड पार्टी किंवा तत्सम ॲप डाऊनलोड करण्यास सांगितले जाते किंवा एखादी बनावट लिंक पाठविली जाते. त्याचा वापर करून भामटे ग्राहकाची बँकेवि- षयीची गोपनीय माहिती चोरतात आणि फसवणूक करतात.

# एसटी महामंडळाचे उद्यापासून २५ जानेवारी पर्यंत सुरक्षितता अभियान

**दि.१०विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

दरर्षीप्रमाणे नवीन वर्षाच्या सुरूवातीला एसटी महामंडळ सुरक्षित प्रवासाच्या दृष्टीने एसटी कर्मचाऱ्यांमध्ये जाणीव जागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने सुरक्षितता अभियान राबविते. यंदा हे अभियान एसटीच्या मध्यवर्ती कार्यालयापासून सर्व आगार पातळीवर एकाचवेळी ११ जानेवारी ते २५ जानेवारी दरम्यान राबविण्यात येत आहे.

या अभियानाची सुरूवात उद्या ११ जानेवारी रोजी सकाळी ११:३० वाजता मुंबई सेंट्रल येथे एसटी महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ.माधव कुसेकर यांच्या उपस्थितीत महाराष्ट्र पोलीस महासंचालक कार्यालयाचे अरविंद साळवे पोलीस अधिक्षक (वाहतूक) यांच्या हस्ते होणार आहे.

रस्ते वाहतूकीमध्ये सुरक्षित प्रवासाला अनन्य साधारण महत्व आहे. गेल्या ७५ वर्षात सुरक्षित प्रवास हा एसटी महामंडळाचा मुख्य हेतू राहिलेला आहे. त्यामुळे एसटीने सर्वसामान्य प्रवाशांच्या मनामध्ये विश्वासार्हतेची व सुरक्षित प्रवास होणार ही भावना निर्माण केली आहे. वर्षभर अपघात टाळण्यासाठी प्रशिक्षण, प्रबोधन, विविध वैद्यकीय चाचण्या अशा विविध उपक्रमातून एसटीच्या चालकांना विनाअपघात बस चालविण्याचे प्रोत्साहन दिले जाते. या बरोबरच ०५ वर्ष,१० वर्ष, १५ वर्ष विनाअपघात एसटी बस चालविणाऱ्या चालकांचा यथोचित सत्कार केला जातो. तसेच २५ वर्ष पेक्षा जास्त विनाअपघात एसटी बस चालविणाऱ्या चालकांचा रु.२५ हजाराचा धनादेश, प्रमाणपत्र, स्मृतीचिन्ह देऊन सपत्नीक सत्कार केला जातो.

अपघात टाळण्यामध्ये चालक हा महत्वाचा घटक असला तरी, प्रवासात त्याला सहकार्य करणारा वाहक व यांत्रीकदृष्ट्या सुस्थितीतील बस पुरविणारे यांत्रीक कर्मचारी हे घटक देखील तितकेच महत्वाचे असतात, हे लक्षात घेऊन एसटी महामंडळाचे यांत्रीक कर्मचारी व वाहक यांचे देखील चालकांप्रमाणे वेळोवेळी प्रशिक्षण व प्रबोधन केले जाते. म्हणून गेली कित्येक वर्ष रस्त्यावरील इतर खाजगी वाहनाच्या तुलनेत एसटीच्या अपघातांची संख्या अत्यंत कमी आहे.

या सुरक्षितता अभियानाच्या माध्यमातून यंदा देखील चालकांबरोबर यांत्रीक कर्मचारी व वाहक यांना देखील अपघात विरहित सेवेसाठी प्रोत्साहित केले जाणार आहे.

# धामणगाव आयटीआयमध्ये प्रभू श्री राम विषयावर विविध स्पर्धा प्रशिक्षणार्थ्यांनी काढलेल्या श्रीरामांच्या चित्रकलेने वेधले लक्ष

**दि.१०विदर्भ प्रजासत्ताक धामणगाव रेल्वे**

प्रभू श्री राम या विषयावर धामणगाव रेल्वे येथील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये विद्यार्थ्यांसाठी निबंध स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, कविता / व्याख्यान स्पर्धा आयोजित करण्यात आले होते. याला उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला.

देशाची आस्था असणाऱ्या प्रभू श्रीरामाची प्रतिष्ठापना येत्या २२ जानेवारी रोजी अयोध्येत होत आहे. प्रभू श्री राम हे सर्व समाजासाठी एक आदर्श आहेत. प्रभु श्री रामचंद्राच्या आदर्श व्यक्तिमत्वाची माहिती विद्यार्थ्यांना व्हावी म्हणून औद्योगिक प्रशिक्षण संस्थामध्ये दिनांक १ ते १५ जानेवारी २०२४ दरम्यान निबंध स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, कविता / व्याख्यान स्पर्धा, आयोजित करण्याबाबत कौशल्यविकास मंत्री व व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाचे संचालक यांनी निर्देशित केले होते. यानुसार धामणगाव रेल्वे येथील आयटीआयमध्ये बुधवारी सदर स्पर्धा आयोजित करण्यात आल्या. सदर स्पर्धेचे उद्घाटन प्राचार्य दिनेश बोबडे यांच्या हस्ते करण्यात आले. तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गटनिदेशक प्रफुल्ल धोटे होते. सदर आयोजित कविता / व्याख्यान स्पर्धेत प्रथम क्रमांक सरिता ढबाले (फिटर), व्दितीय ऐश्वर्या भेंडे (कोपा) तर तृतीय क्रमांक यश देशमुख (इलेक्ट्रीशियन) यांनी मिळविला. निबंध स्पर्धेत प्रथम क्रमांक श्रेया कवाडे (वायरमन), व्दितीय जया वंजारी (कॉस्मोटॉलॉजी) व तृतीय क्रमांक सुजल कांबळे (आयसीटीएसएम) यांनी पटकाविला. याशिवाय चित्रकला स्पर्धेत प्रथम क्रमांक सौरभ नागोसे (आयसीटीएसएम), व्दितीय प्रगती बोरकुटे (फॅशन डिझाईन ड टेक्नॉलॉजी) व तृतीय सुहानी चिकराम (इलेक्ट्रीशियन) यांना मिळाला. कार्यक्रमाच्या यशस्वितेकरिता शिल्पनिदेशक तुषार जैन, बोधी राऊत, प्रल्हाद परमाळे, राजेश मेश्राम, शहजाद खान, कपिल मोहोड, प्रिया काळे, स्वप्निल तेलंग, कल्याणी ठोसर, नारायण लेंडे, निलेश नागळे, चिन्मय चंदेले, सुधीर गोरखा, योगेश धाणके, रवि शेलोकार, जगदिश वानखडे, मडावी, ढबाले यांसह प्रशिक्षणार्थ्यांनी परिश्रम घेतले.

# थकवा, चिडचिड वाढली का? हिमोग्लोबिनची पातळी तपासा

**दि.१०विदर्भ प्रजासत्ताकअमरावती**

थकवा येणं, डोकं दुखणं,चिडचिड वाढणं अशी लक्षणे दिसून आल्यानंतरही अनेक महिला याकडे फारसे गांभीर्याने लक्ष देत नाहीत. वाढलेला थकवा, चिडचिड हे हिमोग्लोबिनची पातळी कमी झाल्याचे संकेत असून, महिलांनी वेळीच खबरदारी घ्यावी, असा सल्ला डॉक्टरांनी दिला. कुटुंबाच्या गरजांची पूर्तता करताना अनेक महिलांना आपल्या आरोग्याकडे लक्ष द्यायला फारसा वेळ नाही. आरोग्याकडे दुर्लक्ष होत असल्याने पुरुषांच्या तुलनेत महिलांमध्ये हिमोग्लोबिनच्या कमतरतेची समस्या अधिक जाणवते. मासिक पाळीतून अतिरक्तस्राव, खानपानाकडे दुर्लक्ष, गरोदरपणात पोषक आहार न घेणे आदी



कारणांमुळेमहिलांमध्ये हिमोग्लोबिनची कमतरता निर्माण होते.हिमोग्लोबिनद्वारे वेगवेगळ्या भागांत शरीराच्या ऑक्सिजन पोहोचवला जातो. हिमोग्लोबिनची कमतरता असणाऱ्या महिलांमध्ये थकवा, अशक्तपणा, फिकट त्वचा, चक्कर येणे, डोकेदुखी, चिडचिडेपणा, शरीरावर पांढरेपणा आदी लक्षणे दिसून येतात. हिमोग्लोबिन वाढणे किंवा कमी होणे हे आरोग्यासाठी धोकादायक मानले जाते.

> हिमोग्लोबिन कमी असल्यास आहारामध्ये लोहयुक्त खाद्यपदार्थांचे प्रमाण वाढवावे, जंकफूड खाणे कटाक्षाने टाळावे. महिलांनी पौष्टिक आहारावर भर द्यावा, काही लक्षणे दिसून येताच डॉ. चा सल्ला घ्यावा.
>
> **– डॉ. रोहन काळमेघएम बी बी एस एम डी मेडिसिन**

हिमोग्लोबिनची पातळी कमी असल्याची शंका असल्यास किंवा संबंधित लक्षणे आढळल्यास, योग्य निदान आणि उपचारांसाठी तज्ज्ञांचा सल्ला घ्यावा, असे डॉक्टरांनी सांगितले. यामुळे महिलांनी योग्य आहाराकडे लक्ष देणे अत्यंत गरजेचे झाले आहे.

**हिमोग्लोबिनचे प्रमाण किती हवे?**

पुरुषांमध्ये १५ ते १७ प्रति डेसिलीटर एवढे हिमोग्लोबिनचे प्रमाणअसणे गरजेचे असते. स्त्रियांमध्ये १३ ते १५ प्रति डेसिलीटर एवढे हिमोग्लोबिन असायला हवे, असे तज्ज्ञ सांगतात.

हिमोग्लोबिन कमी झाल्यास शरीरावर त्याचे काही परिणाम लगेच जाणवतात.

**पालेभाज्या खा – हिमोग्लोबिन वाढवा**

शरीरात हिमोग्लोबिनचे प्रमाण ठरवून देण्यात आले आहे. यासाठी पालेभाज्या, फळांमध्ये सफरचंद, अंगूर, पेंडखजूर, अंजिर, बीट आदींचे नियमित सेवन करावे. तसेच गूळ-शेंगदाण्याचे सेवन केल्यानेही हिमोग्लोबिनचे प्रमाण वाढविता येते.